# सुरभी

(फुलांवरील काव्यसंग्रह - भाग २)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**सुरभी** (फुलांवरील काव्यसंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : माघ कृ. १२, शके १९४५,
गुरूवार, दि. ७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-7-1

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २०० /-

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण

फुलांवर मनापासून प्रेम करणाऱ्या
सर्व सुमनवेड्या सुमन सुमनांना
ही कृती सादर समर्पित !

# मनोगत

फुलांच्या राज्यात सुगंधी वारे वाहत असतात. परिमळणारे क्षण, स्पर्शातली तलम रेशीम, रंगांची धुंदी, फुलपाखरं छंदी, कळ्यांचे गोड रूपडे, फुलांचे ताटवे, परागांच्या तुऱ्यांचे नटवे, सुरभित वातावरण या सगळ्यांचा मनावर इतका जादुई परिणाम होतो की आपलंच मन आपल्यासाठी नवखं होऊन जातं. आपणच आपल्या प्रेमात नव्यानं पडायला लागतो. जगण्यातली मजा क्षणोक्षणी येऊ लागते.

दु:ख कुठे जातात? भुर्रर्र ... उडून जातात कुठेतरी, जणू कधीच नव्हती ही दु:खं आपल्या मनात, क्षणात भुईवर स्वर्ग अवतरतो अन् नंदनवनीच्या सुखद क्षणांनी आपण हुरळून जातो. फुलांवर तर आपलं मन भाळतंच पण भाळलेल्या व्यक्तीसाठीही फुलंच मदत करतात.

जीवनातल्या सुखदु:खाच्या प्रसंगांना, भक्तीच्या, प्रेमाच्या भावनेला फुलांचं कोंदण मिळतं तेव्हा भावना अनमोल होतात. अळुमाळु नाजुकशा फुलांच्या सुरभीने जगण्याला सौरभपंख लाभतात. मग काय फुलं, फुलं अन् फुलंच मनात ठसून जातात. टवटवीत फुललेली असोत की सुकून जवळ जपून ठेवलेली. आठवणींच्या आठवणींना ते सोबत बाळगतात, म्हणूनच फुलं खूप जीवलग व आपलीशी वाटतात. खरंच ती आपली असतात...

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

निसर्ग ही केवळ पृथ्वीवरील वस्तुस्थिती नसून ती मानवाच्या जीवनाशी जोडलेली एक अमूल्य भावना आहे. निसर्गाचा नित्य बदलणारा आविष्कार आणि त्यातील अपरंपार सौंदर्य प्रत्येक संवेदनशील मनाला स्पर्श करतो. आपल्या काव्यसंग्रहात या निसर्गाच्या विविधरंगी छटा, त्याचा गहिरा अर्थ आणि आपल्याशी असलेले त्याचे नाते अत्यंत ओघवत्या शैलीत मांडले आहे व निसर्गाचे विविधरंगी सौंदर्य, त्याचा नितांत शांतता देणारा स्वर, आणि त्यातील अनंत प्रेरणा यामुळे तो प्रत्येक कवीच्या मनात एक वेगळा ठसा उमटवतो.

या संग्रहातील कवितांतून निसर्गातील सौंदर्याचे वर्णन असले तरी त्याही पलीकडे जाऊन त्या आपल्याला निसर्गाचे मौलिकत्व जाणून घेण्याची प्रेरणा देतात. कधी निसर्ग चैतन्याचा संदेश देतो, तर कधी अंतर्मनाला शांततेचा स्पर्श करतो. तसेच संग्रहातील कविता केवळ फुलांचे वर्णन करत नाहीत, तर त्या फुलांशी आपल्या नात्याचा मागोवा घेतात. कवयित्रीने फुलांचे बारकावे टिपून शब्दांमध्ये जिवंत केले आहेत.

संग्रहात वाचकांना फुलांचा नवा पैलू उलगडण्याचा अनुभव येईल. निसर्गरम्य दृश्ये, फुलांचे काव्यात्मक चित्रण आणि मानव–फुलांचा संबंध यांचा अनोखा संगम आपल्याला या संग्रहात पाहायला मिळतो. कवयित्रीची सखोल निरीक्षणशक्ती आणि कल्पकता ही प्रत्येक कवितेच्या ओळींत प्रतिबिंबित होते.

या संग्रहातील कवितांनी वाचकांच्या मनात निसर्गाविषयी एक नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास आहे. ही कवितांची ओढ निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन यासाठीही आपल्याला प्रोत्साहन देईल व निसर्गाच्या अवर्णनीय सौंदर्याचा आणि त्याच्या अद्भुत काव्य संग्रहाचा हा प्रवास वाचकांना नक्कीच समृद्ध करेल, असा मला विश्वास आहे. डॉ. श्रीम. मंजुषाजी कुलकर्णी यांना सदरच्या अभिनव संकल्पनेस खुप खुप शुभेच्छा.

**राजेंद्र मुकुंद गोळे**
उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न
जमाबंदी आयुक्त कार्यालय (नागरी भूमापन) म. राज्य, पुणे

# अनुक्रमणिका


१) बहरून आला बहावा ... ११
२) संन्यासी अंतर्मुख हा ... १२
३) पाकळी पाकळी
अशी मोहिनी ... १३
४) सत्य स्वप्नं होऊ दे ... १४
५) कुमुदिनी प्रियवर चंदर ... १५
६) असे हसावे मनमोकळे ... १६
७) एक पोकळी अशी बकुळी. १८
८) नव्या फुलांचे रंगही घेशील. २०
९) सहवासाचा सुगंध बकुळी... २१
१०) केतकीचे उमलणे ... २२
११) मन पाऊस पांघरी ... २३
१२) जगणे असते असे ताटवे ... २४
१३) कुंदा बेभान मी झाले ... २५
१४) असून रात्र पहाटेने
येथे उमलणे ... २६
१५) रम्य उत्तरे कुणी मांडियले... २७
१६) प्रकाश होऊ द्यावे दैव ... २८
१७) अनंत होऊन रहाणे ... २९
१८) बीज सुखाचे रुजून
येऊ दे ... ३०
१९) युगे अचंबित होतील ... ३१
२०) मन हादग्याची फुलं ... ३२
२१) रूप गोजिरे फुला सुमनसा... ३३
२२) तू सखा सखीचाही मज ... ३४
२३) हृदय बकुळीवर ... ३५
२४) गुलवारगुलाबी ... ३६
२५) तू गुलदानी ... ३७
२६) मन गुलाबाचे ... ३८
२७) पारिजातकी सुमने रंगली ... ३९
२८) पदतळी माझ्या
सडा फुलांचा ... ४०
२९) करशील देवा मला मोगरा... ४१
३०) ते रसिक खरोखरू ... ४२
३१) खुशीत दुःख होईल गहाळ... ४४
३२) स्वप्नं कांचनी हो साकार ... ४५
३३) एक एक पाकळी ... ४६
३४) निळूले निळूले
सुमन हासले ... ४७
३५) सखी मोगऱ्याची रे ... ४८
३६) गुलाबकळी होऊन
जीवनी ... ४९
३७) गाली अबोली खळी ... ५०
३८) म्हणून जीव वेडा
तुझ्या त्या अदांनी ... ५१
३९) गुलाबी मनाचे
स्वप्नवेडे सुगंध ... ५२
४०) मनात ठसली
ही पुष्पराणी ... ५३
४१) खुलते पुन्हा अबोली ... ५४
४२) बदले जनांचे बघणेही ... ५५
४३) जगण्याची नवी आशाही ... ५६
४४) इतुके सुंदर सुमन जयाचे ... ५७
४५) हृदयपाकळी गुलमदनाची ... ५८
४६) तृप्त अंतरीचे डोळे ... ५९
४७) असा वारसा
परिमळांचा धरू या ... ६०
४८) रोज सकाळी मोहमोहवी ... ६१

४९) खरं सांगू... तू असतेस ना... ६२
५०) तुला आठवत
आठवत... ... ६३
५१) गंधकोशी कोरलेले
ध्यास माझे ... ६४
५२) सारे सारे रंग खुणावती ... ६५
५३) शेवंती ... ६६
५४) मळा उतरला स्वर्गामधला... ६७
५५) उमलून रोज यावे ... ६८
५६) चला रंगू या निज रंगातून... ६९
५७) निज खुशीत रमावे ... ७०
५८) असे मीलन देखणे ... ७१
५९) जाई गंधाळून गेली ... ७२
६०) फुलून सार्थक वाटावं ... ७३
६१) रसिक तो जो जपतो
सुरंगी क्षणाला ... ७४
६२) जणु भाव हे अव्यक्त ... ७५
६३) कधी फूल नवनवखे ... ७६
६४) रानोमाळी
फुलल्या ओळी ... ७७
६५) ठेवा सांभाळून
निज हृदया ... ७८
६६) जुईली जुईली ... ७९
६७) सुकुमार सुमन वेड्या ... ८०
६८) आयुष्याची होऊन बकुळी... ८१
६९) एवढाच मज वर दे ... ८२
७०) बहावा ... ८३
७१) तुझे बहाणे... ... ८४
७२) मोगरी सुवास ... ८५
७३) बहर मोगरी ... ८६
७४) बकुळ नसतो
कधी फितुर ... ८७
७५) सारे कासार शोभते ... ८८
७६) आतल्या बागेत
सुंदर फूल ... ८९
७७) जुई मन होत जाते ... ९०
७८) ऋतुराज रंगताना ... ९१
७९) फुला रे, तुझीच कायम
मनास भूल... ... ९२
८०) पुन्हा मी ओंजळीत... ... ९३
८१) गुलाबपुष्पापरी वहावे ... ९४
८२) आस मधुरल्या क्षणांची ... ९५
८३) फूल ते किती वाट पाहते ... ९६
८४) रंगवल्ली सुंदर परिभाषा ... ९७
८५) खुणवत राही वाट सोनेरी ... ९८
८६) धरतीशी भुले अंबर ... ९९
८७) प्रेमाची शिदोरी
वेगळी गं ... १००
८८) तुजवर आजही
भुलला ग ... १०१
८९) दोषी सखये मोगरा ... १०२
९०) काट्याकुट्यातून
डोले फूल ... १०३



## (१)
## बहरून आला बहावा

असा निघळला स्वर्गामधला
कुबेर खजाना पहावा
मोजीत असता धरी कोसळला
बहरून आला बहावा

लखलख सोने पुष्प जाहले
स्वर्णभूषण नाव
जानकीस प्रिय कर्णी घालण्या
कर्णिकार घे ठाव

अलंकारांनी मढलेला कुणी
राजा लोभसवाणा
राजवृक्ष म्हणे कुणी आरेवत
शरीरा ठेवी देखणा

आरग्वध, शम्पाक, व्याधीघात
रोगा शमवून जाई
चतुरंगुल, कृतमाल, सुवर्णक
दीर्घफल, नाम घेई

स्वर्णभूषण अन स्वर्णांग
कांचन अंगी पसरते
जणू उषेचे पिवळे दूकुल
अडकून यावर झरते

ती शिवानी साजामध्ये
तुलाच मढवून घेते
आणि शिवाच्या हृदयामध्ये
अलगद गढून जाते

अमलताश तू आण वसंता
उष्मा होई सुसह्य
फुले पाहुनी मृदुल रेशमी
प्रीतभावना असह्य

हळद माखली अंगोपांगी
लाजे वधू बावरी
अन लज्जेचे वसन पीत हे
पिवळ्या हाती सावरी

असा बहावा गाली फिरावा
शहारून येईल अंग
लाडिक लज्जा चरमसीमेला
लेईल सुवर्ण रंग

दि.२८/०४/२१
दुपारी ०५.११ वा.



## (२)
## संन्यासी अंतर्मुख हा

ग्रीष्मात बहरल्या गुलमोहराचा
आधार वाटतो केवढा
अंधाराच्या साम्राज्यातून
रविकिरण झळाळी एवढा

रंगांचा हा रम्य सोहळा
छटा केशरी लाल
झळा उन्हाच्या तप्त वाहत्या
तू गारवा सांभाळ

विराण आणिक ओसाड भवती
तरी तशातून फुलतो छान
एक रंग उधळून आपुला
बेरंगाची झुके कमान

गुलमोहराचे झाड एकटे
चित्र बोलके अर्थ महान
रंग एवढे कुठून आणतो
कलाकारा त्या नम्र प्रणाम

तपत्या ऋतूतुन बहरासन करी
अतुल्य यती हा असा पहा
जलथेंबही ना पंचक्रोशी
संयम त्याचा दृढ अहा

वस्त्र केशरी झोळी पाकळी
खांद्यावरती लटकून
जवळून जाता कुणी तयाच्या
दृष्टिसुखाची भिक्षा टाकून

संसाराची रखरख प्रेरक
संन्यासी अंतर्मुख हा
आत्मरूपाचे चित्र रेखिले
गुलमोहर फुलला की पहा

दि. २९/६/१९
सकाळी ८.१५ वा



## (३)
## पाकळी पाकळी अशी मोहिनी

मोगरी फुलराण्या फुलून आल्या
हासल्या हासल्या गाली
जवळ काही कळ्यांनी त्यांना
विचारले गुज कानी

का गं एवढ्या प्रसन्न तुम्ही
गंध गेला दूर वनी
आलंय कोण भाळून दोन
फुलपाखरं की रानी

कोणीतरी सखीवेडा ही आला
गजऱ्यासाठी घेऊन गेला
संन्यासी कोणी भक्तीची गाणी
गाऊन ठेवा देवासी नेला

कुणी चिमुकली बालिका आली
फुलांना हळुवार स्पर्शून गेली
आई कोणी आली होती दमलेली
मोगरी जवळ रमून गेली

नासिका खरी ऐश्वर्यवती
गंध अलौकिक हुंगत राहती
ती या सुरभीस मनी पाठवी
ऋतूविनाही मोगरीला आठवी

फुलू दे अंगणी मोगर आंदणी
चंद्र दिलाचा घोंगवे रिंगणी
पाकळी पाकळी अशी मोहिनी
पुनवेची तीत रोज चांदणी

दि.१८/०४/२१
रात्री १२.०१ वा




(४)

## सत्य स्वप्नं होऊ दे

स्वप्नं वाटते इथे थांबले
झाडांवरती थोडे
गुरफटून ते अधिकंच होते
गोड गुलाबी कोडे

कशी सोडली हिरवळ पाने
क्षणात या तरुराजे
रंग गुलाबी घे पांघरुनी
रूप वेगळे साजे

कधी वाटते सोडून द्यावे
तेच ते नियमित जगणे
कधी लिंपावे रंग वेगळे
भिन्न थोडे वागणे

पायवाट ही आपणच आपुली
सडा टाकुनी पहावी
रंग वेगळा शिंपडून त्या
प्रसादाशी न्यावी

मन प्रसन्न चित्त प्रफुल्लित
श्रृंगाराचा वसंत
अंतःकरणा अशी मिळू दे
लाडिक एक उसंत

तूही सोडून रंग तेच ते
रंग वेगळे घ्यावे
जीवनवाटेवरती माझ्या
फुले पेरूनी जावे

थकले मी रे काट्यांवरूनी
हासंत चालचालुनी
आता लाभू दे दुलई मऊमऊ
सुख दे तू अंथरुनी

तनमन माझे, मीही गुलाबी
तूही गुलाबी, स्वप्नं गुलाबी
दिशा गुलाबी, नजर शराबी
रंग गुलाबी, हास्य गुलाबी

स्वप्नं ठरू दे सत्य हे लोभस
सत्य स्वप्नं होऊ दे
कष्टंही माझे होत गुलाबी
विलयाला जाऊ दे

दि.१५/०३/२१
दुपारी १२.४५ वा.



## (५)
## कुमुदिनी प्रियवर चंदर

उत्पल असं उमललं
अरविंद कसं खुललं
इंदिवराची शोभा
खुदकन हे पद्म हसलं

कमल हे नाजूक सुंदर
कुवलय रम्य निरंतर
मोहक मृणालिनी अन
कुमुदिनी प्रियवर चंदर

सरसिज सरोवरातून
पंकज चिखलातून
शतदल सहस्रदल हे
उमलून डोले जलातून

भुईकमलांची राने
जलकमलांचे ताटवे
पंकेरुह जगण्याचे
सरोरुह सरसिरुह हे

अंभोज अंभोरुह ते
तमरस पुष्कर कमले
कमळ हे उमलून आले
बिस प्रसूनही नयनी पहावे

कल्हाराचा गंध
सौगंधिका सुगंध
रक्त संध्यका कुमुदा
कमलपुष्प आमोदा

नावे किती ही सार्थक
राष्ट्रीय पुष्प समर्पक
उमलून येता दारी
लक्ष्मीचा अर्थ सांगत

दि.०७/०८/२१
सायं. ०५.२६ वा.




## (६)
## असे हसावे मनमोकळे

असे हसावे मनमोकळे
असे निरागस फुलून यावे
असेच अलगद झोकून देऊन
असे वाऱ्यावर झुलून घ्यावे

असे कळ्यांना चित्र दाखवत
द्यावी प्रेरणा उमलावयाला
जेव्हा फुलणे पूर्णपणे मग
अंगी भिनवू या जगण्याला

रंग कोणता अधिक गडद नसो
मग यशाचा अभिमानाचा
फिक्या असाव्या छटा या सगळ्या
मंत्र ध्यानी ठेवू सुकण्याचा

अल्पकाळ हे टिकते सारे
कशास हुरळून जावे क्षणभर
सौंदर्याची टिमकी नको ना
नको गर्व हा मनात घरभर

हास्य असे ना असते शाश्वत
दुःख किनारी त्याचे गलबत
दुःख तरी बघ कुठे निरंतर
हर्षसागरी नावा झुलवत

जे जे आहे नाही आपुले
कुणीतरी तो महान दाता
कृतज्ञ राहून पळापळाला
श्रेय त्याचे ते त्याला देता

आपण केवळ आलो येथे
आनंदाची बाग फुलावी
सुकून मातीमध्ये गळुनी
काया पुन्हा ही मृन्मयी व्हावी

या मातीला गंध मिळावा
सत्कर्माच्या अत्तरकुपीचा
तिच्या कणातून पुन्हा झरावा
शीतल गंधित असा गारवा

पुन्हा बिजाचे अंकुर व्हावे
एक रोपटे भरभर वाढे
हळूच डोकवी कळी ही कवळी
पुन्हा फुलांचे पडू दे सडे

चक्र सुरेख नि नियत हे असते
कधी खाली ते वरंही जाते
वरचे खाली येतांना मग
उगा खंत का मनी वाटते

उसळून येईल पुन्हा दिमाखे
ऋतुराजाला अंगी घेईल
पुन्हा एकदा फक्त फुलावे
क्षणात जगणे सुंदर होईल

दि.०७/०३/२१
सकाळी ११.४७ वा.



## (७)
## एक पोकळी अशी बकुळी

का एवढी बकुळफुलें गोळा करून छळ माझा करतेस
मौन अशा चित्रातंही भावरंग भरतेस

काहीच बोलंत नाहीस ती बकुळीही अबोलीच असते
आपली भेट ठरलेली पण मी न आल्याने उधळलेलीच असते

तू सायंकाळपासून अगदी मध्यरात्रीपर्यंत धुमसंत घुसमटंत काळाचं भान हरखून
बकुळीजवळच थांबळीस स्वतःलाही हरवून

मीही हरवलो कुठेतरी आपली भेट विसरून
पण आपल्यात फरक आहे राणी तू माझ्यात हरवून मी दुसरीत विरघळून

तू आणि ह्या बकुळीनेच शिकवली प्रीत मला
काहीही न बोलता गंधानं भारून सर्वस्व देण्याची रीत मला

मी देह पाहंत सौंदर्य शोधत गेलो बकुळीला तुला सोडून
गुलाबी कळ्यांच्या जाई जुईंच्या मळ्यात स्वतःला धुंद बुडवून

तरीही बंधुंदी काय असते ती तुम्ही दोघींनीच शिकवलीत
जन्म गेला तरी एखाद्यासाठी थांबून प्रेम करण्याची प्रथा तुम्हीच सांगितलीत

आजंही बकुळी पाहतो जिथेही
दुर्लक्षिलेली जाणवतात मला त्या तुझ्या वेदना काळवंडलेल्या
सावळ्याशा फुलांनी तुझ्या प्रीतकळ्या कोमेजलेल्या

आता तर अगदी जीवंच निघेल असं वाटतं
जेव्हा तू आजंही काहीच न बोलता
तुझ्या मनाविरुद्ध झालेल्या अंगणातल्या बकुळफुलांना
केळीच्या पानावर अलगद गोळा करतेस

पण त्या फुलांनी माझ्याकडे
पाठ फिरवलीय हे दिसतं गं राणी
बघ ना तू मनाने उदास
मी भोगूनही भकास

एक पोकळ काळ कळंत नकळंत बकुळीच्या गंधात मंदाळलेला
एक विरह अजूनही टोचणी देत बोचणी देत फुलं बनून रेंगाळलेला

नको ना अशी इतकी सारी बकुळफुलें एकदाच मांडू या पानात
शब्द न लिहिताही रंगात बुडवून बकुळीला छापलंस या मनात

आता हा गंध, तुझी आर्तता व्याकुळता भिणवत असतो माझ्या गात्रागात्रात
किती मी वेडा एका खऱ्याखुऱ्या प्रेमाला मुकलोय हे सांगत असतेस,
न लिहीलेल्या तरी कोरलेल्या तुझ्या पत्रात

दि.२५/०२/२१
सकाळी ०७.३१ वा.



## (८)
## नव्या फुलांचे रंगही घेशील

अशी प्रफुल्ल हसरी सुमने
अशी टवटवीत राखून मने
जगणे लोभस गोजिरवाणे
आयुष्याला गंधित करणे

ह्या उद्यानी लक्ष वेधती
नव्याच कोमलशा फुलजाती
आकाराने विशाल पुष्पे
परी नाजूकता अंगोपांगी

रंग गुलाबी फिकट कोवळा
अंतर्भागी बघ मधुशाला
गुंजन करूनी मधूप्राशनी
भृंगही जमती आनंदानी

तुझ्या आतल्या अशा गोडव्या
दे पसरवूनि गुणी रे सख्या
मुक्तपणे तो मध चाखू दे
जगणे तुझे ते जगता निरखू दे

फिटो डोळ्यांचे जसे पारणे
उसंत मिळू दे अंतःकरणे
बाग फुलू दे वाऱ्या झुलू दे
फूलपाखरे गुलगुलू करू दे

मग शेवटी स्वतःला पहा
चित्र देखणे जे झाले अहा
तनमन हलके आत्मा हलका
क्षणक्षण तुझाच होई बोलका

असे कृतार्थ ते जगणे पाहून
रुजण्या मातीमध्ये जाऊन
पुन्हा उमलशील बहरून येशील
नव्या फुलांचे रंगही घेशील

दि.०५/०७/२१
सकाळी ०७.४० वा.



## (९)
## सहवासाचा सुगंध बकुळी

तू बकुळीच्या गजऱ्यासम अशी
घट्ट बिलगुनी राहशील का
नाजूक देही परिमळ लेऊन
स्वर्ग सुखाला देशील का

आत राहू दे धागा कणखर
आपुल्या प्रिय नात्याचा
एक एक गुंफून घेऊ दे
प्रीतभाव हृदयाचा

मन सुमनाला ओव सारखे
क्षणकुसुमांच्या ओळी
उत्साहाच्या खुलू दे पाकळ्या
खुदकन हासू गाली

झाला का बघ गुंफून गजरा
पुन्हा नव्याने घ्यावा
सहवासाचा सुगंध बकुळी
ओंजळीतुनी प्यावा

अशा टवटवीत फुलपाकळ्या
परी बांधणी नाजुकशी
अशीच मिळू दे सखी बकुळीवत
हळुवार साजुकशी

दि.२३/१/२१
सकाळी ०६.३२ वा.



## (१०)
## केतकीचे उमलणे

केतकीचे उमलणे
दूर रानी वनी
काटे किती अंगावरी
परी गंध मनी

सहजीच हाताशी ती
नाही ना अंगणी
एकटीच खुले परी
ओली ती पापणी

कोण कधी येईल का
जाणता जीवनी
गूज तिचे तिच्यापाशी
ती एकटी काननी

कुणी कधी तोडुनिया
बाजारी मांडतो
तेव्हा तिचा आत्मा हा
तिजसीच भांडतो

कुणावरी केले प्रेम
दिसतो ना कुणीही
केवड्याच्या व्यथा इथे
नेणतो कुणीही

उठळपुथळ चोहीकडे
ओळखीची फुले
केतकीच्या मनी बघा
बोले जग निराळे

किती पदर पिवळेशार
उकलुनी पहावे
कांचनाच्या आत कणीस
अत्तरी दिसावे

दि.०१/०७/२१
पहाटे ०४.२७ वा.



## (११)
## मन पाऊस पांघरी

कळी भिजली भिजली
मनी उमलून आली
अंगावर दवबिंदू
माळ मोतीयाची झाली

ऋतू भिजण्याचा आला
गंध मातीचा सुटला
निजलेल्या बिजागरा
कवळा अंकुर फुटला

गर्भार वसुमती
सस्य तिची हो संतती
तरारून उगवती
साऱ्या धान्याच्या प्रजाती

मळे फुलांचे फुलती
फळबागा हो डोलती
घरादाराच्या छताशी
थेंब सूरही धरती

पानोपानी गुज ओले
ओली पाकळी पाकळी
धुंद वाहतो शरीरी
वारा अत्तरांच्या कुपी

असे लावण्य हे चिंब
खट्याळाच्या प्रीतसरी
तनू भिजली मनीही
मन पाऊस पांघरी

दि.३०/४/२१
सकाळी ०७.५४ वा.




## (१२)
## जगणे असते असे ताटवे

असे ताटवे मना मोहविती
क्षणात फुलेच व्हावे
वाऱ्यावरती सुगंधगाणे
खुशीत डोलून गावे

कधी वाटते गुलाब व्हावे
प्रिय हृदयी विलसावे
कधी रंग वेगळेच लेऊन
अलगद उमलून यावे

आकारांची अशी विविधता
परिमळणे हुंगावे
उगाच येथे वाट वाकडी
करून कधी गुंगावे

विसरून जावे ताणतणावा
नयनसुखाची सरिता
कधी प्रियेच्या अधरांसम दल
भाव मनीचे भरता

जगणे असते असे ताटवे
फुलवून आणु कुसुमा
राखून ऐसे सुंदर बगीचे
जीवन हो अनुपमा

दि.२६/०६/२१
दुपारी १.३१ वा.



## (१३)
## कुंदा बेभान मी झाले

कुंद वातावरणी
उमलून कुंदाराणी
बोल प्रीतीचे बोलती
पाकळ्या त्या तुझ्या मनी

नभ भरून आलेले
कधी कोसळेल सारे
तुझ्या अलगद देही
मस्तवाल झोंबे वारे

प्रीत तुझ्यावरची ही
आज कुंदावलेली जी
कुंदा मंदावली जरा
धुंदी अशी पांघरली

अशी हासली गालात
जरा लाजलेली तनु
अंग चोरटी भावना
उधाण हे माझ्या मनु

कुंदा बेभान मी झाले
तनमन चिंब ओले
सजनाचे स्पर्श सारे
पाकळीत बंद केले

दि. १६/०६/२१
सकाळी ०८.१४ वा.




## (१४)
## असून रात्र पहाटेने येथे उमलणे

कसे इतके उमलून आलात सारे
असे भाग्य माझे हे फळलेय का रे
तुम्ही ब्रह्मकमळे असे शुभ्र रंगी
शयनास विष्णूची ही शेज न्यारी

किती वाट पाहून थकले मी होते
पानास हे पान जन्मून जाते
उमलता म्हणे जेव्हा उजळेल दैव
अशी अंगणी सांभाळीली मी ठेव

हृदय पाकळी तुम्हा बसण्यास केली
अन भक्तीभावे तुम्हा हाक दिली
तिन्ही देवतांच्या संबंधी कुसुमे
उमलून तुम्ही निशाही उजळली

असे तोडीले भावभक्तीसवे नि
शिवशंभूपिंडी सहज वाहीयेले
गर्भात विष्णू ब्रह्मयाचे स्थान
असे रूप त्रिदेवी कुणी पाहियेलें

विसावे मनाच्या तळाशी ते फुलणे
असून रात्र पहाटेने येथे उमलणे
नवी एक रुजवात झाली म्हणावी
नवी एक सुरुवात अंकुरली जी

दि.१८/०८/२१
२१/१२, १५:४६



## (१५)
## रम्य उत्तरे कुणी मांडियले

रंगबिरंगी फुलली पुष्पे
रांगोळी जणू रंगीत वठली
अशी प्रसन्न ही सकाळ पाहता
नंदनवन खुण सुंदर पटली

हिरव्या हिरव्या पल्लवांवरी
गेंद फुलांचे खुलून आले
जणू हास्य ते देवस्त्रियांचे
वसुंधरेवर भुलून आले

ती मृदुता कोमलता लेवून
दलादलातून उमलून स्पर्श
गालावरती फिरते हलके
मोरपीस जणू देऊन हर्ष

या नयनांनी भुरळून जाऊन
असे देखणे चित्र पहावे
अन कुसुमांच्या लाडिक गावी
सृष्टीसंगे मित्रची व्हावे

लाल गुलाबी पिवळे केशरी
अत्तर कुणी हे सांडियले
उगाच प्रश्न भेडसाविती
रम्य उत्तरे कुणी मांडियले

रमले तनमन रमले जीवन
अंतर्मनी उद्यान प्रकटले
क्षणात साऱ्या मज दुःखांचे
गोजिरवाणे पांगची फिटले

दि.२८/०८/२१
सकाळी ०७.२१ वा.



## (१६)
## प्रकाश होऊ वे दैव

सूर्यफूल मज होता यावे
मी तेजाशी मुख मिळवावे
मागे मागे तेजा पाठी
तेजाचे मी गाणे गावे

आराधना मज चालो निरंतर
पडो ना त्यातून काही अंतर
कसला तम हा तमा ना त्याची
तेजासाठी मुख स्थित्यंतर

अंगावरती लेऊन पहावे
चमचम ऐसे सोने न्यारे
सोनसळी ती तिरीप उन्हाची
पोसून उदरी बीजा घ्यारे

आत पोसू द्या स्नेह ओलावा
तरारून या येतील बीया
आरोग्याचा मंत्र जपुनी
दिवा जळो वा पोसो काया

डोल डोलूनी जगणे व्हावे
हास हासुनी खळखळ जावे
मळभ दुःखाचे सावट सोडून
तेजाच्या किरणातून न्हावे

सूर्यफुलासम फुलणे सदैव
सूर्यासंगे झुलणे सदैव
कुण्या अंधारा घाला पाठी
प्रकाश होऊ द्यावे दैव

दि.२४/०८/२१
पहाटे ०५.४६ वा.



## (१७)
## अनंत होऊन रहाणे

का हससी उमलुनी अनंता
गंध सांडतो खाली
तुझ्या आगमने देवपूजेची
लगबग सुरूही झाली

किती टपोरा गेंद तुझा हा
छंद मलाही लागे
श्री गणरायासंगे तुजला
मीही अर्पून पाहे

कधी लपलेला उंच झाडाशी
कधी असा झुकलेला
कधी सुरभीच्या कोशामधुनी
गंधे तू माखलेला

रुबाब थोडा तुझा वेगळा
आस कधीची जागे
कधीतरी तू उमलून येऊन
दे श्रीमंती बागे

श्रावण भाद्रपदातून पाऊल
तुझे अंगणी पडते
एक रेष मग भक्तीभरली
आसमंती ही उडते

स्पर्श तुझा तो कवळा कोमल
कोमल तुझे पहाणे
मीही तुझ्यातच खोल बुडूनही
अनंत होऊन रहाणे

वाट पाहतो अनंत तत्त्वे
अनंत तुज आकाश
अनंत मोद भरूनही उरतो
अनंत जागे प्रकाश

मीही उमलून तुझ्यासवे हा
देवाचरणी विसावे
तिथून मनाला निरखून माझ्या
पाहत तृप्त हसावे

दि.०३/०९/२१
सायं. ०६.१८ वा.



## (१८)
## बीज सुखाचे रुजून येऊ दे

निळ्या नभाच्या पटलावरती
सोनफुलें कशी उमलून आली
गर्द रेशमी पाकळ्यातुनी
पराग पुंजे खुलून आली

असे वाटते नक्षत्रची हे
धरणीवरती उतरून आले
चमचम चमकुन रंग सूनहरे
अंगावरती लेऊन आले

प्रसन्न त्यांची पाहून आभा
मन किती हे हरखून गेले
किती पोळत्या जखमा वेड्या
घाव फुलांनी भरून गेले

असे फुल तू ठेऊन हृदयी
कोमल माझ्या येई जीवनी
अशा भोगल्या विराण गाथा
चल नव्याने गाऊ गाणी

आत जसे हे जपले कणकण
पराग नवनिर्माण होऊ दे
कानन असले जरी ओसाड हे
बीज सुखाचे रुजून येऊ दे

दि.११/०९/२१
सकाळी ०९.४३ वा.



## (१९)
## युगे अचंबित होतील

आरक्त रमणीय स्वर्ग तुकडा
ही पुष्पे न च पल्लव सडा
मार्गिका किती देखणी
जणू सजविलेला केशर कडा

की वाटतो मज प्रीतीचा हा
चरम भेट सोहळा
जीव दोन एकरूप होताना
रुधिरप्रवाह आगळा

या सदनांनी शृंगाराची
नेली टिपेला साथ
सुखसुखांच्या केशरवेली
देती हातातून हात

पदकमलांच्या खुणा पटाव्या
हृदय तळी पसरूनी
आलेखची हा सुंदर केवळ
प्रेम मनी पेरुनी

असे बहरुनी येता तरुतम
पर्णे कामना होतील
पूर्ण होऊनी हलके हलके
पवनी झुलून जातील

रेशीम सारी मृदुता सांडून
भुईशी गालीचा होईल
तुझ्या आठवणी मांडून साऱ्या
ऋतुराणी बिंब निज पाहील

एक क्षण मग युगात बदलून
युगे अचंबित होतील
सुगंध सारे एकवटून मग
स्वतःच गंधित होतील

दि.१२/०९/२१
सकाळी ०९.४३ वा.



## (२०)
## मन हादग्याची फुलं

असा हादगा हादगा
चव जिभेला विचारा
भाजी नाजुक कवळी
भजी खमंग ग करा

नाव अगस्ती झाडाचे
पेरतात बांधावर
मंदिराच्या शेजारीही
ऋषी तत्त्व अंगावर

पंख पसरून रावे
जणू फुलं की होतात
स्पर्श मऊशार कित्ती
रंग दुधी पाकळीत

औषधी ग वनस्पती
पान फुलं साल गुणी
अवजारं करतात
आगपेटी काड्या कुणी

खोड असे उपयोगी
पाने जनावरं चारा
पावसाळी हवेतून
हादग्याला बहर आला

तसं बहरलं मन
माहेराच्या अंगणात
भजी रेंगाळली किती
माझ्या मन कोंदणात

बाप आणायचा हौशी
हादग्याची फुलं खूप
माय भाजी भजातून
चवी देते नवं रूप

आज दिसता हादगा
सय माहेराची येई
भजी भाजीतून मन
हादग्याची फुलं होई

दि.०४/१०/२१
सकाळी ०८.५७ वा.



## (२१)
## रूप गोजिरे फुला सुमनसा

देवाने भरली अत्तर कुपी
रंग साज वेगळा
रूप गोजिरे फुला सुमनसा
छंद तुझा आगळा

देठामध्ये किती भरले हे
परिमळ सुगंध कोश
पराग नाजुक रंग गुलाबी
होय रसिक मदहोश

कधी वाटते शृंगाराच्या
कुणी लपविल्या छटा
लज्जा अनुनय प्रीत मनवता
वाऱ्यावरती बटा

साक्षी होऊन प्रीतकलांना
साठवून ठेविले
पोटामध्ये मदन कटाक्षही
मदिरेसम जाहले

फुला गोडुल्या तुझ्या आतल्या
उघडून दे सुरभीस
दुरून पाहिले तरी झिंग ही
वेगळी ये मस्तीस

कधी प्रियेने लाजलाजुनी
वसन घट्ट जे धरले
तुझ्या स्पर्शाने अलगद तेही
प्रणयातुन ओसरले

किती वेळेला तिज अधरांवर
कुसुमा तुज फिरवून
तिच्या भावना भरास आणील्या
मदन बाण मिरवून

साथी तुझ्यासम या सृष्टीतील
लावण्याचा धनी
सखी राहते आणि तिच्यासवे
तूच तू माझ्या मनी

दि.१७/११/२१
सकाळी ९.१२ वा.




## (२२)
## तू सखा सखीचाही मज

या गुलाबा काय माहीत
दव मनावर साचलेले
हृदय माझे मज सखीस्तव
मीही ऋतूवर वेचलेले

येते मजला शिरशिरी अशी
तुजसी मी पाहतो कधी
रे गुलाबा उमलते बघ
मनपाकळी तुज आधी

तूच मज आधार देशी
तूच अनवट मार्गही
तूच करशील अधीर कितीदा
तूच सुख जणू स्वर्गही

रंग तव पाहून स्मरते
मज सखी मजला सदा
त्या किती नाजूक गंधित
रेशमी रे तिच्या अदा

त्यावरी दव सांडती बघ
लज्जेचे किती देखणे
मी हळूच मग प्रीतभरले
प्रणयचित्र ते रेखणे

पहिली भेट की भेट कोणती
तू मध्ये भरतोस रंग
शृंगाराच्या किती छटा अन
तू स्वतःतच असशी दंग

तू दिलासा तू हवासा
तू सखा सखीचाही मज
सांडूनि जातोस गाली
अधरी विश्रांती सहज

दूत बनुनी राहशी तू
आजही दोघांत ना
शब्दही ना खर्चितो मी
तूच देशील साथ ना

दि.२१/११/२१
रात्री ०८/२१ वा.



## (२३)
## हृदय बकुळीवर

असा गुंफला हार बकुळीचा
की मन माझे तू
नाजूक माझ्या भावफुलांना
प्रीत दे धाग्यातून

एक एक अलगद उचलून घे
फुलास हाती रे
प्रेमासाठी प्रवेश देण्या
उत्सुक नाती रे

शर्थ एक बघ जपणे त्यातून
नाजूकता सांभाळ
मनास इतुके हळवे कर की
मग माझा प्रतिपाळ

कोसळले जरी तरुवरातून
खाली मी भुईवर
वेचून घे ना तरल भावना
हृदय बकुळीवर

आज ओवला गजरा साजूक
हात तुझे गंधित
प्रीत पोचते सुमनातली ही
सुमनी अखंडित

दि.१३/१२/२१
दुपारी १२.५१ वा.



## (२४)
## गुलवारगुलाबी

गुलबदन गुलाबी
दल पाकळ्या मल्मली
गाली गुलाली
रेशमाळलेली

तू गंधाली
मदमस्त रती मदनाची
मोहिनी साजनाची
कामिनी

अंगणात फुलतांना
गंध जाय वनी
मीलनी साजणी
गुलाबाची

स्पर्श रुमाली
मज नाव कोरले
कशिद्याने भरले
गुलवारगुलाबी

नजर शराबी
ते गाल गुलाबी
हास्य जवाबी
मोहवते

अधर पाकळ्या
गुलाबी ओसंडून गेल्या
किती बोलल्या
स्तब्धपणे

दि.०१/०२/२०२२
रात्री ०८.४३ वा.




## (२५)
## तू गुलदानी

शपथ गुलाबी
त्या तलम गुलाबाची
होशील ना राजी
मनभावनसाथी

आठवण आली
कळी गाली हसली
मनात ठसली
गोडी गुलाबी

गुलाब वेडा
मज खुणावतो ना
चोरुनी पाहता
मनी फुलतो हा

कळी बोलली
गुज हळूच खोलली
वाऱ्यावर डुलली
कळी गुलाबी

गोडी वाढली
नाती मुरली गुलकंदाची
मज छंदाची
राणी गुलाबी

तुझी छबी
अदांची गुलाबी खुबी
रुजवानी आधी
तू गुलदानी

अत्तर ह्रदयी
कोश घडविले कोणी
दल जणू पापणी
गुलाबराणी

दि.०१/०२/२०२२
रात्री ०९.३२ वा.



## (२६)
## मन गुलाबाचे

गुलाब फुलला
ऋतू राणी मोहरली
गंधाने बहरली
लाजली

स्पर्श रेशमी
संदेशाची सुंदर खणी
उमलतो मनी
राजगुलाब

मुक्या भावना
वाच प्रियेचे
मन गुलाबाचे
मोहक

कधी बोचतील
काटे मत्त परी
गुलाब ह्रदयांतरी
उमलतील

जगणे माझे
धुंद गुलाबी निशा
सुरभिल्या दिशा
गुलाबाच्या

दि.०१/०२/२०२२
१२.४१ वा.



## (२७)
## पारिजातकी सुमने रंगली

उमलून आली फुले कोवळी
कोवळी भाव मने गंधाळली
प्राजक्ताची ही रीत मधुरिमा
मधुरिमा धुंदी गे रेंगाळली

त्या कोषातून अडकून गेलो
गेलो अलगद हृदयांतरी
उमलून आल्या शुभ्र पाकळ्या
पाकळ्या सखे हृदयमंदिरी

तुझे गात्र प्रिये कोमलकांती
कोमलकांती ही मना मोहवी
गंधपरिमळे घडे सांडती
सांडती अत्तरे छबी ही हवी

दवबिंदूंचे मोती पसरले
पसरले धुके भल्या सकाळी
तुझी ओढ मज मना मोहवी
मोहवी प्रियतमा सायंकाळी

फुले सानुली रमवून गेली
गेली न कधीही मनी राहिली
प्राजक्ताची प्रियतमा नाजुक
नाजूक समयी होत काहिली

निमित्त होऊन पारिजातकी
पारिजातकी सुमने रंगली
कथा जाहल्या प्रेमभारल्या
प्रेमभारल्या राजसी दंगली

दि.१४/०२/२०२१
सकाळी १०.१७ वा.




## (२८)
## पदतळी माझ्या सडा फुलांचा

असा फुलू दे वसंत जीवनी
रंग भरा येऊ दे
पदतळी माझ्या सडा फुलांचा
रेशीम तलम उमलू दे

स्पर्श कोवळे किती मल्मली
मन माझे बहरू दे
तुझ्यासवे ही सृष्टी सारी
मुक्तपणे विहरु दे

साथ असावी अशी बोलकी
शब्द नको मोजूनी
बघ डवरून जे आले फुलोरे
मोहून नेती अजुनी

हात असावा हाती माझ्या
जन्मोजन्मीची वचने
या फुलांच्या आणि ऋतूच्या
स्मृतिफुला वेचणे

माझ्या डोळ्यांमध्ये फुलावे
स्वप्न असे वेगळे
तू मी मी तू असू सोबती
क्षण सुंदर आगळे

सहज विसावे मन हे माझे
इथे तुझ्या संगती
उभा तरू हा ऋतुराणीच्या
खुणा ल्येत अंगती

किती कोवळे तलम भाव हे
मन माझे गहिवरे
गळत अश्रू मग आनंदाने
होत मोती सावरे

अशा क्षणांवर आयुष्याने
स्वतःस झोकून द्यावे
हळुवार या फुला पाकळ्या
मनी साठवून घ्यावे

दि.१९/०२/२०२२
सकाळी ०९.३७ वा.



## (२९)
## करशील देवा मला मोगरा

फुले मोगरी हसरी हसरी
घेऊन हातामध्ये
सुगंध पेरीत जाईन सखये
तुझिया जगण्यामध्ये

असे वाटते होत मोगरा
मीच उमलावे राणी
अलगद वाऱ्यासवे तुझ्याशी
जवळून गूजकहाणी

कळी होऊनी झाडावरती
कौतुक तुझे मी घ्यावे
जवळी येशील वाट पाहशील
भाग्य डोळा मी पहावे

जपशील मजला जीवापाड तू
वेळेवर जल देऊन
वाढत जाता उष्मा सगळा
साथ देईन मी उमलून

घेशील हाती घेत जवळी तू
गंध हुंगुनी सजनी
जन्म सार्थकी लागेल माझा
गंध तुला तो देऊनी

करशील देवा मला मोगरा
तिच्या अंगणी नक्की
मीलन असू दे क्षणिक तरीही
गंधवेडी मज सखी

दि.२१/०३/२०२२
सकाळी ०७.२७ वा.



## (३०)
## ते रसिक खरोखरू

ही फुलदांडी की
झोका माझा
छत्र पावसाळी

अर्धा ओला
होता मी तर
आलो फुलातळी

इवल्याशा मज
पावलांनी
घट्ट दांडी धरली

पाऊसधारे
ओली धरणी
वर्षा मनी भरली

शिरशिरणारे
अंग कोवळे
थंडी ही भरली

जीव तळमळे
गरमी चहूकडे
रात उन्हाळी सरली

वनराणी भिजली
भिजली अवनी
घरटे माझे ओले

स्वप्न तयासम
रंगीत होता
इंद्रधनू उमटले

उद्यानातील
पुष्प नाहले
सुगन्ध त्याचा ओला

पराग सांडता
फुला तरतरी
रानी गवगवा झाला

मी सान पाखरू
तुझ्या आसरु
शोभा वाढत गेली

नाचत आले
फूलपाखरू
वर्दी तयाने नेली

फुलाघरी बघ
गोड पाहुणा
सान पाखरू आले

इवल्या नयनी
बघता सुमना
चित्र तयाचे झाले

फूल फुलले
पाखरू झुलले
मी नावाचे फुलपाखरू

माझ्या आधी
गंध हुंगला
ते रसिक खरोखरू

दि.३०/६/१९
सकाळी ७.२७




## (३१)
## खुशीत दुःख होईल गहाळ

मवाळ फुलांनी मुखवटा लावला
सिंहाचा तोंडवळा मग रंगवला
म्हणाले आता होऊन जाऊ
फुलांचे राजे बनून पाहू

रंग जरा वेगळा सुंदर जांभळा
आयाळ पांघरु पाकळी पाकळ्या
लगेच आता नाही हसायचं
फताड्या नाकाला जरा फुगवायचं

सिंहाचा चेहरा रागीटच फार
नरसिंह रुपात विष्णू अवतार
पुष्पसिंह आज मिळेल नाव
फुलांचा मस्त वधारेल भाव

कधीतरी असे वेगळाले चेहरे
लावून जगावे परजीवन खरे
मुखवटे सुखवटे, नको दुखवटे
मजेत रहावे, असे वेगळ्या वाटे

आम्ही बघा मवाळ झालो जहाल
जहाल असाल तर व्हा ना मवाळ
एकदम वेगळं अनुभवू सगळं
खुशीत दुःख होईल गहाळ

दि.२३/०३/२०२२
सकाळी ०७.३९ वा.



## (३२)
## स्वप्नं कांचनी हो साकार

लोलक सुंदर नाव बहावा
सुवर्णरंगी फुले वाह वा
निसर्ग रमतो स्वच्छंदाने
पिवळा सोहळा असा पहावा

कुणी प्रियेच्या प्रतीक्षेत तर
कुणी अनुनय करण्या जातो
उमलून आल्या बहाव्याकडे
गुज मनीचे घेऊन जातो

उमलून उमलून हसणारा तो
प्रियारंजनी सहाय्य करतो
तप्त झळा अन ग्रीष्मामधल्या
तापावरती उतारा ठरतो

तिच्या कुंतली माळून देता
रूप तिचे ते उजळून जाते
एक अनामिक गीत प्रीतीचे
बहाव्यासवे डोलून जाते

तिचे बहाणे तूही जाणतो
तुझा केवढा मज आधार
तुझे फुलोरे अतिकोवळे
स्वप्नं कांचनी हो साकार

दि.२४/०३/२०२२
सकाळी ०९.११ वा.




(३३)
**एक एक पाकळी**

सोनपिवळी फुलं उमलली
हास्य किती हे गोड
फुला पाहुनी कळी उमलते
फुलणे ते अजोड

फुलणे सोपे नसते काही
किती करावा त्याग
रूप सारखे बदलून घ्यावे
नित्य नवा हा साज

हट्ट सोडता बीजाने
खपवून घेता मातीत
अंकुर सान वर वर येतो
भेग भुईच्या छातीत

ऊन साहणे सर झेलणे
वारा वेडा पिसा
उंच वाढण्या एकच पथ्य
या साऱ्यांवर भरवसा

हळूहळू आकारा येई
रोप अंकुराचे
कोंब कळीचा डोकावतो
अन वेध लेकुराचे

फळ बहरण्या कळीने
आधी स्वतःस फुलवावे
ऋतुराजाला आनंदाने
कवेत झुलवावे

एक एक पाकळी
नव्या रंगात न्हाऊनी येते
रेशिमस्पर्शी पराग कोशी
फूल कळीचे होते

आता फळाला आस लागली
कधी मी ये आकारा
त्यासाठी रे सुकवून देणे
फुला तुझ्या शरीरा

किती वेळ मग मिळतो फुलाला
स्वतःस खुलविण्या
सदा हसून ते कसर न सोडी
कळीस फुलविण्या

दि.२/७/१९
सायं ७ .२० वा



## (३४)
## निळूले निळूले सुमन हासले

निळुले निळुले सुमन हासले
पापण्या मिचकून गोड दिसले

कवळे कवळे अंग रेशमी
श्यामरंगाची खुण रेशमी

हिरव्या देठी लाज लाजले
राधाप्रेमा जणु पांघरले

वनी असो वा कुंजवनी ते
राधेश्याम गीताला गाते

सदाचि डुलते सदाचि हासते
राधावाटेवर फुलून बसते

निळ्या निळूल्या फुलाच्या मनी
प्रीत पराग पेरिले हे कोणी

कुणासही आठवे तो मोहन
सावळा सखा पाहताक्षणी

दि.०९/०४ /२०२२
२१/१२, १६:१७



## (३५)
## सखी मोगऱ्याची रे

का छळती मज पुन्हा पुन्हा या,
कळ्या मोगऱ्याच्या
स्मृती जागवती सख्या तुझ्या
त्या, लाडिक प्रेमाच्या

कितीदा आल्या अवचित हाती,
प्रीत जणू जाहल्या
ऋतू कोणता असला तरीही,
मदनबाण पाहिल्या

छंद जीवाला तुझ्या संगती,
क्षण मोहक करण्याचा
ओंजळीतुनी प्रेम आपुले,
मोगऱ्यात भरण्याचा

दिवस असो वा असू दे निशा,
मनभर सुगंध पसरे
पाहताच हा गजरा साजुक,
आठव ते क्षण हसरे

कुणास ठाऊक का हा उमलतो,
दाहक ग्रीष्मातुनी
दुःख जाळते म्हणून स्वतः,
पोळून फुले आतुनी

जमू दे जगणे असे मोगरी,
ताप किती जरी झाला
कळ्या शेकडो अंगावरती,
उमलून मोगरा गेला

तू असशी वा नसशी जवळी,
साथ मोगऱ्याची रे
आसू होतील गंधित वेड्या,
सखी मोगऱ्याची रे
तुझी ही,
सखी मोगऱ्याची रे

दि.२४/०४/२०२२
सकाळी ०७.०३ वा.




## (३६)
## गुलाबकळी होऊन जीवनी

फिक्या गुलाबी गुलाब कळ्यांनो
उमलून येता पहाटे
इथे मनातून भाव कोवळे
उमलून येती कुणाचे

वाट पाहतो मी तुमच्या या
अलगद उमलून येण्याची
घाई मला रोजचीच असते
प्रीत तुम्हांसवे कथिण्याची

रंग साजूकसा जसा हा तुमचा
तिचा चेहरा तसाच दिसतो
तेजाळून मोहक तो मुखडा
लाजून गालामध्ये हसतो

कधी साखरेच्या झोपेतच
तिचे अधर मी चुंबून घेतो
स्पर्श जाणवती तेंव्हा तुमच्या
पाकळ्यांचे मी गुंतून जातो

तिच्या कपोलांवरती तुमचे
कोमल रंग नि स्पर्श फळावे
तिच्या आठवांनी बेभान मी
तुम्हास बिलगून तिज मिळवावे

म्हणून वाटते रोज रोज तुम्ही
उमलून यावे माझ्या अंगणी
तीही येईल अवचित लाजत
गुलाबकळी होऊन जीवनी

दि.०८/०५/२०२२
सकाळी ०७.२६ वा.



## (३७)
## गाली अबोली खळी

ही अबोली निळी निळाली
रंग लोभस वेगळा
वेगळेपण घेतले की
होतो सुंदर सोहळा

नाव जरी आहे अबोली
बोलते ती भावना
शब्देविणही सांगते की
काय ते माझ्या मना

संयमाची पाकळी अन
तलम अंगी सोसणे
प्रेम ना झाले प्रकट तरी
आत गुपचूप पोसणे

झुंड ना येते कधी पण
रसिक माझा आगळा
रेशमाचे हृदय हो त्याचे
तो मनाने चांगला

हाती अवचित तो धरे मज
थरथरे ही पाकळी
प्रीत वेडी चोरटी ही
गाली अबोली खळी

दि.१०/०६/२०२२
दुपारी १२.३७ वा.



## (३८)
## म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी

उमलती कुठे मोगरे आठवांचे
कुणाला तरी गजरे ते पाठवायचे

ते गंधाळले ओघळती क्षण सुखाचे
मना अजय छळती किती ते फुकाचे

कधी मोगऱ्या संग गजऱ्यात मरवा
कधी भेटीचा लाभतो धुंद गारवा

तू होशी अबोली बिलगता मला ग
गालावरी रंग लज्जा खुलला ग

असे पाहुनी गजरे मी वेगळाले
कळीचे तुझे पुष्प होणे कळाले

ते गंध माझ्या उराशी प्रकटले
जेंव्हा तुझे माझे क्षण एकवटले

तनु नाजुकी प्रिये गजऱ्यात दिसणे
प्रणयी तुझे लाजुनी मधुर हसणे

म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी
फुले साथ करिती तुला त्या मदांनी

दि.१७/०६/२०२२
सकाळी ०७.४२ वा.



## (३९)
## गुलाबी मनाचे स्वप्नवेडे सुगंध

गुलाबी गुलाबो नशा पाकळ्या ह्या
प्रिया ओढ वाटून जणू वाकल्या ह्या

उमलून येता मदनदूत व्हा रे
निःशब्द सारे तरी बोलणारे

रंगाची गोडी हृदयी लिंपणारी
प्रियाप्रीती गहिरी कधी न संपणारी

गुलाबाची राणी गुलाबी ती काया
गुलाबात न्हाऊन गुलाबच जणू व्हाया

तलम भाव सारे उमलती कळीचे
सुटे आज कोडे गुलाबी खळीचे

मनाजोगता लाभता धुंद वारा
गुलाबी मनाचा फुलून ये पिसारा

गुलाबात मुरल्या, अदाऽऽऽ गुलकंदी
गुलाबात उरल्या, भावना ज्या स्वच्छंदी

देशील गुलाबी अशी साथ राजा
गुलाबी प्रियेची मिठी रोज राजा

क्षण सारे धुंद मज कोशात बंद
गुलाबी मनाचे स्वप्नवेडे सुगंध

दि.२७/०६/२०२२
सकाळी ०७.४० वा.



## (४०)
## मनात ठसली ही पुष्पराणी

घंटाकारी सुमन सुंदरी
नीलकांती तियेची
धरतीवरल्या नंदनवनी ही
मिजास पहावी तियेची

रंग आकाशी निळसर छटा
भुईस पाहते नार ही बघा
ऋतू तिला जो न्याहाळून घेतो
लाल लाजुनी झुकली अहा

नाजूक कवळी अंग शेलाटी
स्पर्श रेशमी मृदुल किती
उमलून येते डुलत रहाते
मना भुलविते अशी रीती

तिच्या प्रीतीच्या घंटानादे
आली जमली फूलपाखरे
गंध आगळा ढंग वेगळा
तृप्त भ्रमरही मधु साखरे

मनात ठसली ही पुष्पराणी
अलगद स्वप्नी मज नेते
काश्मीर उद्यानातील माझ्या
सुंदर वेळा पाठवते

दि.२३/०८/२०२२
सायं ०७.२७ वा.



## (४१)
## खुलते पुन्हा अबोली

घट्ट ओवला दाट केवढा
गजरा अबोलीचा हा
न बोलणाऱ्या फुलांचा वाचा
नजराणा ओळखीचा

डोळ्यास दिसती छान
दोऱ्यास बिलगलेल्या
हळुवार प्रीत नाजूक
मांडीत बोलल्या या

ना गंध ना सुगंध
आहे जरासा हळवा
माझ्या प्रियास कोणी
अबोल भाव कळवा

हा रंग भावतो ना
देतो मना उभारी
किती शांत सात्विकाची
देते ही साक्ष सारी

दिसता अशी अबोली
तू आठवे मला ग
द्यावासा भेट म्हणुनी
गजरा असा तुला ग

मीही अबोल होतो
तू जाण बोल माझे
डोळ्यात वाच राणी
सारेच प्रेम माझे

गजरा निमित्त होते
हसते उगाच गाली
फुललेली प्रीत पाहून
खुलते पुन्हा अबोली

दि.१२/०८/२०२२
रात्री ०८.२६ वा.



## (४२)
## बदले जनांचे बघणेही

हे झुकलेले गेंद बोलती
झेंडूसारखे वागा
भरीव तुम्ही होऊन स्वतः
विनम्रतेने जगा

झाड कसले ते झुडूप इवलुसे
पाने लांबट नाजूक फार
किती घट्टसर भरीव भरती
झेंडूची फुले झुपकेदार

पेलवतील का नाजूक झुडुपा
तरीही अगणित फुलतील ती
वारा येवो अथवा नाही
स्वतःच खुशीत डुलतील ती

तसे पाहता रूप फारसे
नसे देखणे झेंडूचे
तरी उत्सवी रूप खुलविती
माळा नि तोरण झेंडूचे

कुठून आलो कूळ कोणते
मूळ असो वा बेताचे
आपण फुलणे फुलून झुलणे
उपयोगी पडणे हे व्हावे

शोभा वाढेल कुणाचीतरी
असे असावे जगणेही
बदले जग मग दृष्टी बदले
बदले जनांचे बघणेही

दि.१४/०९/२०२२
सायं ०६.१४ वा.



## (४३)
## जगण्याची नवी आशाही

बाळ ओठातील हसू असे
उमलून आले फूल जसे
कांती तयाची इतुकी सुंदर
तयासी उपमा कुठे नसे

स्पर्श तान्हुले किती कोवळे
तसाच दलसंभार इथे
हसऱ्या फुलात हसऱ्या मुलात
पराग खुशीचे वसती जिथे

पाहताक्षणीच वाटे पटकन
फुलास घ्यावे मुलासही
जिवापाड जपणे दोघांना
कोमेजू ना क्षणासही

केवळ आनंदास वाटणे
माहीत या दोघांनाही
निखळ गोडवा लोभस रुपडे
लुभविती ते साऱ्यांनाही

एक उमलता फूल उमलते
अंगणातली शोभाही
एक जन्मता मूल जन्मते
जगण्याची नवी आशाही

दि.२०/०९/२०२२
सकाळी ०९.५६ वा.




## (४४)
## इतुके सुंदर सुमन जयाचे

पिवळ्या धम्मक तलम पाकळ्या
झुडुपाला नसतीच झावळ्या
फुलास रेघा शिंपल्यापरी
भुईमुगाच्या फुलराण्या आगळ्या

गर्भामध्ये दाणा इवला
दोन पंखुड्या वारा घाला
आत चिमुकला कोंब वाढतो
भुईखाली तो जीव ओवला

कसले सुंदर रूप निर्मितो
क्षणात स्वर्गा जणू वर्णितो
किती काळ हे पुष्प उमलणे
त्यास्तव इतुके श्रम हे उधळणे

प्रत्येकाचे भाग्य आगळे
आपुलेही सौभाग्य वेगळे
पोट एक तरी पदार्थ न्यारे
आपुल्यासाठी घडती सारे

भुईतून आकारास येतसे
भुईमुगाचे रूप लोभस ते
इतुके सुंदर सुमन जयाचे
गुण सांगावे कसे तयाचे

दि.२४/०९/२०२२
सकाळी ०६.३७ वा.



## (४५)
## हृदयपाकळी गुलमदनाची

स्वप्नसरोवरी उमलून आल्या
कितीतरी लोभसशा कमलिनी
पुष्प देखणे रंग गोजिरे
दृष्टीची जणु बंदी मोहिनी

रम्य जळातील रमणी सुंदर
नजर पोचते खुलल्या तिथवर
असे वाटते फुलल्या कामना
आयुष्याच्या अतिमनोहर

वर आकाशी इंद्रधनुचे
रूप देखणे कमानीतले
मिळते जुळते रंग फैलवीत
स्पर्धा चाले चित्र आतले

कमळे गुलाबी, जल गुलबक्षी
आकाशातून गुलाल नक्षी
जगणे गुलाबित गुलशन गुलवर
गुलबंदीची नजर गुलाक्षी

त्यात तरुणी ही मूर्त गुलाबी
पाठमोरुनी गुलबदनाची
तिचे गुलमयी छत्र गुलालस
हृदयपाकळी गुलमदनाची

दि.१३/१०/२०२२
सायं ०६.५० वा.



## (४६)
## तृप्त अंतरीचे डोळे

गुल्म उमलून आले
कळ्या कळ्या त्या फुलल्या
हळुवार वाऱ्यासंगे
हिंदोळ्यावरी झुलल्या

मन बगीचा होताच
माळी आपणच व्हावे
रंग सुंदर विचारी
बीज पेरूनीही द्यावे

विवेकाचे खतपाणी
आनंदाची गात गाणी
झुळझुळू पाट वाहो
आयुष्याच्या रम्य वनी

कधी उन्हाचे तडाखे
पाळंमुळं पक्के ठेवू
एक आतला आवाज
सदा ऐकूनिया घेऊ

कधी जोरदार धारा
बरसवतात गारा
भुईसपाट ना होणे
व्हावा स्वतःचा निवारा

वादळांचे सूं सूं धाक
मनसुबे बेचिराख
आहे एवढे सामर्थ्य
आत मनात तू झांक

बाग अध्यात्म उमले
जीव शिवासंगे डोले
काय जाणायाचे आता
तृप्त अंतरीचे डोळे

दि.२०/१०/२०२२
सकाळी ०७.४५ वा.



## (४७)
## असा वारसा परिमळांचा धरू या

उमलत्या फुलांचे असे ताटवे हे
मनातील उमलून आले भाव वाटे

कधी डोलती आतल्या स्व सुखाने
कधी हलवी वारा भाळलेल्या मुखाने

किती गंधकोशात जपले स्वतःला
तरी देत जाईल उधळून स्वतः ला

जमावे असे धुंद धुंदीत रहाणे
किती मस्त मस्तीत फुलती बहाणे

जगावे असे नित्य झोकून द्यावे
तूफान येताच वाकून जावे

न ताठरता कुठली नसावाच गर्व
सुकणे जरी पक्के, जगण्याचे पर्व

चला ऐशी सुमने मनांना करू या
असा वारसा परिमळांचा धरू या

दि।२८/१०/२०२२
सकाळी ०६.४९ वा.



## (४८)
## रोज सकाळी मोहमोहवी

याहून सुंदर काय असेल ते
सौंदर्याचे उमलती मळे
गर्द गुलाबी ओष्ठराग हे
नाहीत केवळ हो कमळे

वर माथ्यावर सुवर्णबिंदी
कांचन झडते नित त्यातून
सोने पसरले मुखश्रीवरी
देत झळाळी तिज आतून

बट नटखट ती उडे खगांची
वाऱ्यावरती झुलताना
कर्णफुले होऊन मेघही
पहा दिसती किती डुलताना

रोज सकाळी मोहमोहवी
लावण्याची सृष्टीराणी
तिचे नितळसे बिंब देखणे
उमटून जाते अंतरातुनी

सुरेख सुंदर अप्रतिम हे
शब्द तोकडे तिज पुढती
रोज नव्याने सौंदर्याच्या
पदव्यांवर पदव्या चढती

दि.१७/११/२०२२
सकाळी ०८.३२ वा.



## (४९)
## खरं सांगू... तू असतेस ना

तुझं फुलणं उमलणं
बहरणं रात्रीचं
तुझं मिचमिच डोळ्यातून
गंध वाटणं खात्रीचं

केवढी ताकद आहे ग
तुझ्या बेधुंद परिमळात
खेचून आणतेस राजसाला
प्रीतीच्या चांदमळ्यात

शब्दही न बोलता
चिंब होतात भाव सारे
लाजण्याचे मुरडण्याचे
भरात येतात आव सारे

अवघडल्या दो जीवांची
मध्यस्थी तूच करतेस
स्वतः प्रत्यक्ष आली नाहीस तरी
सुरभीला पाठवून देतेस

मग काय होश कसला
नुसती पसरे बेहोशी
अलगद सजनी जाऊन विसावे
सजन प्रीतीच्या ग कोशी

एवढं करूनही ....
आळ लाडिक तुझ्यावर
रातराणीमुळे पुन्हा फिदा
म्हणतो प्रियवर माझ्यावर

खरं सांगू... तू असतेस ना
म्हणून मीलन यादगार
इतका सुगंध मादक तुझा
मनास विलोभे फार फार

दि.२२/११/२०२२
सकाळी ०९.३२व.



## (५०)
## तुला आठवत आठवत...

काय माहित बकुळी
तुला पाहिलं की आठवतं
ते शाळेतलं पहिलं प्रेम
मनाला पुन्हा पुन्हा तिथंच पाठवतं

शाळेच्या बाहेर
तुझा बहर सडा पडायचा
त्याचा तुझा माझा पाय
नेमका तिथंच अडायचा

मग काय बहाणा आमचा
तुला वेचण्याचा
तुला ओंजळभर भरत
गोड क्षणांना खेचण्याचा

वहीतून पुस्तकातून जायचं मग
एक फुल प्रीतीचा संदेश घेऊन
तेही अबोल मीही अबोल
अबोल काही हृदयाच्या तळातील देऊन

शाळा संपली ...शाळा संपली
आयुष्याने कितीतरी वळणं घेतली
पण तुला सांगू..
आजही माझ्या काळजाच्या वहीतली
ती नाजूक बकुळफुलं मी वेचली

का कुणास ठाऊक
ती कवळी कवळी अंकुरलेली प्रीत
ती ठाऊक नसलेली वेडी रे रीत
आजही मधूनच डोकावते अन
मी पुन्हा शाळेच्या अंगणात तुझी होते
मी पुन्हा बकुळी वेचते
तुला आठवत आठवत...

दि.२८/११/२०२२
सकाळी ०८.२४ वा.



## (५१)
## गंधकोशी कोरलेले ध्यास माझे

पारिजाताचे हृदय माझे कोवळे
गंध देता आपसुक मग ते दरवळे

भावनांच्या पालवीला बहर येता
गुल्म कलिका उमलुनी तो प्रहर होता

सांडते होऊन परिमळ सुंदराचा
वेचशील का ओंजळीतून सडा रे त्याचा

देह अंगण भारलेले श्वास माझे
गंधकोशी कोरलेले ध्यास माझे

अलवार अलगद प्रीत तारील अंतराला
सांग ना जपशील माझ्या काळजाला

मी समर्पण मूर्त होऊन ना सुकावे
तू ही त्या अर्पणास वेड्या ना मुकावे

जीवनाला सुवास देईन दरवळून
सुकुमार सुमना पाहशील सखया वळून

दि.१४/१२/२०२२
सकाळी ०५.०९ वा.



## (५२)
## सारे सारे रंग खुणावती

रंग रंगल्या धरतीवरती
आज फुलांचा मेळा
कुसुम कामिनी नाजुक कवळी
स्पर्श तलम करू गोळा

फिक्या गडद रंगांची उधळण
चित्र देखणे लोभस
वर निळाई पांघरून किती
सुंदर नभ ही मोहक

कोणता पडे पसंत रंग हो
सांगणे कठीण जाईल
सारे सारे वर्ण मिसळुनी
सुवर्ण दालन होईल

रंग मलमली रंग मखमली
रंग फूलपाखरे
रंग लेऊनी आली धरणी
तिचे रंगभरे नखरे

सारे सारे रंग खुणावती
वाटे मला ते व्हावे
आज एक तर उद्या वेगळे
रंग फुलांना द्यावे

दि. २४/१२/२०२२
दुपारी ०३ .३२ वा.



## (५३)
## शेवंती

शेवंतीच्या रानात मधुवंती
येशील का राणी तू लाजवंती
कानात सांगू, वाऱ्याला टांगू
होईल सुखाची गऽऽमंऽऽती

रंग पिवळा पिवळा
शेवंतीचा मळा
पांढुरकी झालर पाकळ्यांची
रांग उमलत्या चोर कळ्यांची
मनाची शेवंती पसंती
होईल सुखाची गऽऽमंऽऽती

वाऱ्यावरी डुलत अशीच झुलत
नाचून गाऊन बेधुंद ती
किती तरी भुंगे मधु प्राशिती
आरास सुंदर मोहून की
देखण्यास मिळंल का उसंती
होईल सुखाची गऽऽमंऽऽती

नजर पडंल तिथवर उमलून
भुईच्या भावना अलगद समजून
गालात लाज अन पाकळीचा साज
शेवंती तोऱ्यात तोऱ्याला गाजवून
भरून काळजात तिची श्रीमंती
होईल सुखाची गऽऽमंऽऽती
शेवंती अशी हो शेवंती

दि.१७/०१/२०२३
सकाळी ०९.२१ वा.



## (५४)
## मळा उतरला स्वर्गामधला

कुसुमकळ्या की अवखळ कोणी
खळ्या अप्सरांच्या
अवनीवरती डोलू लागल्या
अदा अप्सरांच्या

नाजूक नाजूक पडतील पदतल
नाद मोह मागे
गवतावरती सौंदर्याचा
असा छबीना जागे

ललना कोणी पुष्परागिणी
गाली स्मित घेवोनी
लाजून मुरडून वाकून खाली
लावण्या ल्येवोनी

कसे वर्णावे रूप गोजिरे
फुलाफुलांचे आणिक
रत्न जडविले तेजश्रीसह
लालचुटुक माणिक

मळा उतरला स्वर्गामधला
युगंधरा सजलेली
आणि दवांच्या माळा घालून
क्षणोक्षणी भिजलेली

दि.२८/०२/२०२३
सकाळी ०८.२१ वा.




## (५५)
## उमलून रोज यावे

फुलल्या फुलास सांगा
किती रंग सुंदराचे
त्या पाकळ्या मृदुलशा
मन उमले अंतराचे

नाजुकसे ह्रदय त्याचे
अलगदसे पांघरावे
आतून परिमळांनी
गंधास सावरावे

फिक्या जांभळ्या छटेची
फुलराणी डोलताना
उमलुन पाहते अर्धी
कळी काही बोलताना

म्हणते मनात माझ्या
सखी स्वप्ने डोलणारी
भाषा अबोल तरीही
गुज सारे बोलणारी

होत्या अजून काही
मिटलेल्या त्या कळूल्या
होईल केंव्हा फूल
त्या वाट पाहिलेल्या

हे चक्र चालते ना
उमलून रोज यावे
होता कळी मनाची
सुमनेची रोज पहावे

दि.२८/०१/२०२३
सायं ०५.४२ वा.



## (५६)
## चला रंगू या निज रंगातून

रंग ठरलेले आयुष्याचे
कुणी तसे ते ठरवावे
फुलेही जेथे देती सोडून
ठरलेपण का मिरवावे

इथे जुईने रंग पांढरा
सहजीच सोडून हा दिधला
रंग पिवळसर अंगावरती
हळद लावली कुणी तिजला

निश्चित ठरले काही नियम की
संकेतांच्या त्या ओळी
निसर्ग सुद्धा खेळत राहतो
रंगीबेरंगी जणू होळी

सारे सारे रंग शोभती
लेऊन पहावे त्यांस खरे
हा आवडता तो नावडता
कशास नखरे त्यात बरे

चला रंगू या निज रंगातून
श्रीरंगाची उधळण जी
रंग त्याचे ते मोरपिसाचे
रंग साजिरे उसळण की

रंग रंगेरी निळे चंदेरी
सोनेरी लाल पिवळे हे
हिरवे बरवे आणि केशरी
काळे कुठे ते ढवळे जे

रंग ओतती तो रंगारी
आयुष्याच्या वसनावर
घ्यावे जावे रंगून अलगद
क्षणाक्षणांच्या असण्यावर

दि.०६/०३/२०२३
सकाळी ०८.३२ वा.



## (५७)
## निज खुशीत रमावे

रानोमाळी उमलती
फुले गुपचूप दूर
त्यांचे कराया कौतुक
यावा काळजास पूर

रंग गुलबक्षी छान
माय राखेरी पान पान
बाप काटेरी जरीही
त्यांचे वारस तुफान

कोणी रसिक न तेथे
तरी उमळण चाले
रोज फुलून हसावे
राती गुमान बसावे

नच कोणीही पाहिले
नाही अजिबात खंत
असे भाळणे स्वतःवर
मग कसली उसंत

असे रुमावे झुमावे
आपल्यातच गमावे
रानफुलासारखेच
निज खुशीत रमावे

दि.०९/०३/२०२३
सकाळी ०९.१६ वा.



## (५८)
## असे मीलन देखणे

अलगद उघडल्या
दल कोवळ्या पाकळ्या
रंग उन्हाचे लेऊन
सोन सोनेरी साखळ्या

आत कुपी अत्तराची
दडविली खोल खोल
कण पराग होऊन
गंध वाऱ्याशी रे डोल

मधूप्राशनास आली
भृंग झुंबड राकट
मधुरव गुंजनात
सारा बहर झाकत

वनातली ही दिवाळी
रोज रोज तेजाळते
दिवे पेटून उठती
वनराई त्या माळते

धुंद रंग पसरती
अंग अंग मधुमय
हृदयात उमलते
प्रिया करे अनुनय

असे मीलन देखणे
रोज कृसुम सुमनी
सुकुमार नि नाजुक
माझी प्रियतम राणी

दि.१७/०३/२०२१
सकाळी ०९.२२ वा.



## (५९)
## जाई गंधाळून गेली

जाई उमलून आली
जीव गंधाळून गेली
लाजलाजून वेलीशी
काही गुज ती बोलली

तुझ्यावर बागडून
कळी कळी की खुलली
वारा भेटताच तिला
धुंद होऊन डोलली

अलगद उमलून
गाली हसली पाकळी
तिच्या गालावर खुले
एक चांदणीची खळी

माझा रसिक कोमल
हृदयाचा मक्तेदार
नाही तोडणार मला
वेलीवरी ठेवणार

कधी वाटते मलाही
त्याला गंध कसा देऊ
मग सांडते अंगणी
सेज गवताची मऊ

हळुवार मनाचा तो
अलगद हुंगणार
साऱ्या जन्माचा सुगंध
देत जाई रंगणार

दि.१९/०३/२०२३
रात्री १०.१७ वा



## (६०)
## फुलून सार्थक वाटावं

दारामध्ये उमललेलं एक रोपटं
डोलून जातं
हसऱ्या त्याच्या पानाफुलातून
हळूच काही बोलून जातं

सांगत असतं आकार आहे,
उंची आहे की रंग तरी हातात आपुल्या
जीवनरस मिळतोय ना आणि रोज नव्याने
खुलतायत कळ्या

हिरवी पाने निळीशार फुलं
त्यावर फिक्या पांढुरक्या छटा
माळून आम्हास सजवून देते
रमणी कुणी आपल्या बटा

कुणी वेडा फुलांचा
नुसतेच पाहत राहतो
गंध त्याच्या अंतरात
कित्येक दिवस वाहत राहतो

दमल्याभागल्या डोळ्यांचा
आम्ही क्षणिक दिलासा
प्रीतीमधले नाजूक भाव
गोड आम्ही खुलासा

कुणी कवटाळून हृदयाशी
हितगुज निःशब्द मांडत जातं
अवेळीच भावचांदणं
वाटेवरती सांडत जातं

राहतो कधी पुस्तकात
जपून ठेवलेले क्षण बनून
जगणे कृतार्थ वाटते कुणा
केवढा आधार आपला म्हणून

फुलून सार्थक वाटावं
इतकं प्रेम मिळतं जेंव्हा
खरं सांगू सुकणं सुद्धा
जीवावर येतं तेंव्हा

दि.०३/०४/२०२३
सकाळी ०९.२४ वा.



## (६१)
## रसिक तो जो जपतो सुरंगी क्षणाला

सुरंगीचा गजरा तुला आठवावा
तारुण्य निधी कांचनी साठवावा

तुझे रम्य कुंतल असे रेशमाचे
ती वेणी सुबक पेड जणु काजळाचे

सांजेस मी रोज येता घराशी
सुरंगीच्या माळून देईन राशी

असा धुंद मादक मदहोश गंध
असा जुळवी राणी दृढ आपुले बंध

प्रिये मी अजूनही आणीन गजरा
तू लाज अजुनी तशी गोडवी जरा

अशी राहो घट्ट गजऱ्याशी वीण
घे ऐकुनी वाजते प्रीत बीन

रसिक तो जो जपतो सुरंगी क्षणाला
सुरंगीत जो मस्त करतो मनाला

दि. १०/०४/२०२३
सकाळी ०५.४३ वा.



## (६२)
## जणु भाव हे अव्यक्त

झुपके खरे की खोटे
आशंक होते मन हे
असते बडीच किमया
जो रेखितो सुमन हे

हिरवाईच्या कुशीत
राशी कुसुम खुशीत
पोसून मोठ्या होता
हसतील कळ्या मुशीत

कोठून आणतो तो
इतकी तलम प्रजाती
दल रेशमाचे अंग
सृष्टी ही विणते नाती

किती शुभ्र धवल रंग
चुटुक लाल ते घोस
वेलीवरी उमलले
सौंदर्य जयघोष

ही केवढी विविधता
किती संगती जुळाव्या
कलाकार तो विरळा
त्या कामना खुलाव्या

पाहून दृष्टी तृप्त
मन होत जाते भक्त
टिपण्या नजर मिळावी
जणु भाव हे अव्यक्त

दि.१४/०४/२०२३
सकाळी ०९.१४ वा.



## (६३)
## कधी फूल नवनवखे

कुठून आणीशी सांग एवढे सृजन सख्या रे देवा
इतके रंग इतके रूप इतका अमोल ठेवा

कधी वाटते तूच तू तेथे साऱ्या पुष्पांमधुनी
हासत डोलत तूच बहरतो साऱ्या ऋतू आतुनी

असा गडद हा निळा जांभळा रंग दिला तू पसरून
अस्तित्वाच्या क्षणात जाते मी या खुणाही विसरून

रंगामधले कोश गडद ते गडद भासते छाया
वास्तव आहे की रे सखया सारी तुझी ही माया

त्या रंगांच्या परागकोशी अमृतमधु भरशी ना
आणि फुलांच्या पाखरास तू छंद मधु करशी ना

रंग वेगळाले जे सारे गंध वेगळे भरीशी
कंद सुखाचे मंद दुखारे बंद जीवाला करीशी

असे वाटते रंग मी व्हावे कधी फूल नवनवखे
कधी मधाचे कण होऊन मी चमके लव लवलवखे

दि.१४/०४/२०२३
सकाळी ०९.३९ वा.



## (६४)
## रानोमाळी फुलल्या ओळी

लंब तुरे हे फिके जांभळे
लोलक राधेचे
शोभून दिसती कर्णडूल हे
सोज्ज्वळ साधेसे

हिरव्या हिरव्या कुंजवनातील
रास सावळ्याची
ही राधेच्या अंतरातली
आस सावळ्याची

फुलून आल्या जरी स्वर्गातून
नजर धरणीवरती
कुणी अप्सरा पुष्पतुऱ्या ह्या
सौंदर्या भरती

उगा पहावे ऋतू सहाही
अलंकार त्याचे
रानोमाळी फुलल्या ओळी
हुंकार असती ज्याचे

साठवून ते रंग निराळे
रूप वेगळाले
क्षणात लखलख तेज उमटता
मालिन्यही पळाले

दि. १४/०४/२०२३
सकाळी १०.०३ वा.



## (६५)
## ठेवा सांभाळून निज हृदया

हे मदनाचे बाण गोजिरे
काळजास भेदती
सावज आपुले गंध पसरुनी
अचूक कसे वेधती

हसऱ्या हसऱ्या धवल पाकळ्या
कोमलतेचे रंग
मदन जोडतो निज धनुषावर
जुळण्या रेशीम बंध

दिव्य सुगंधामुळे प्रफुल्लित
होय मनाची पाती
रूप देखणे स्पर्श मुलायम
शर सांधुनिया जाती

आत मधाचे नर्म मर्म हे
धर्म प्रीतीचे होती
कुणी भक्तीच्या गाभाऱ्यातून
सेज फुलांची सजवती

आल्या उमलून नंदनवनीच्या
कळ्या कुसुम अप्सरा
ठेवा सांभाळून निज हृदया
झरेल ताजा झरा
भाव वाहू द्या जरा

दि.०५/०५/२०२३
सकाळी ०८.२२ वा.



## (६६)
## जुईली जुईली

जुईली जुईली नाजुक जुई ग
केवढी हळवी वेली नि भुई ग

कवळ्या पाकळ्या कवळ्या जाणिवा
कवळ्या स्पर्शाच्या कवळ्या भावना

गालाशी रुळवून तुला मी रुजवून
मनात उमलून येशील बहरून

केवढी नाजुका जुई तू साजुका
संगती रहा ग गंधाला मागू का

गंधही मंद नि जीवाला छंद ही
जुईली काळजाच्या पेटीत बंद ही

दि.०६/०५/२०२३
सकाळी ०८.१७ वा.



## (६७)
## सुकुमार सुमन वेड्या

कुठल्या फुलास माहीत
परिमळणे कोणासाठी
दरवळ सहर्ष नेतो
वारा दहा दिशाही

आतून सुमन सुंदर
मम भाव परागांचे
करतील पुष्प सोपे
प्रकटन अनुरागांचे

झणी भावना फुलातुन
त्या काळजात जातील
सखीचा निरोप माझ्या
हासून ते पहातील

ते कापरे अधर अन्
थरथरती तनु कोमल
तन्वी भुलून जाईल
पाहून पुष्प सेजल

आता न कळते कोण
होते क्षणी सलज्ज
ते कुसुम प्रियांगी का
प्रियाराधक मी सज्ज

कैसे मी फेडू ऋण हे
सुकुमार सुमन वेड्या
रती कोरते मनात
मदनाच्या पडती बेड्या

दि.२७/०५/२०२३
सायं ०६.११ वा.



## (६८)
## आयुष्याची होऊन बकुळी

ओंजळीतल्या बकुळफुलांनो
मन माझे जाणता
गंध खोलवर दरवळतो अन्
स्मृती सहजी आणता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

कवळ्या कवळ्या तुझ्या पाकळ्या
जणू सांगती कथा आगळ्या
रसिक तुझे ते असतील अगणिक
कुणी आहे का ह्रदय मानता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

उंच तरूवर उमलून फुलणे
स्वतः स्वतःशीचे जे खुलणे
अलगद एका हळव्या क्षणी त्या
झोकून पदतळी ओघळू पहाता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

मीही देते सुगंध प्रीती
प्रियवर मीलनी अनोखी रीती
अशीच देते परिमळ सखया
मिठीत त्याच्या मिटून जाता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

सुरभी व्हावी जगण्याची या
आयुष्याची होऊन बकुळी
रोज नव्याने होऊनी कलिका
फूल उमलुनी बकुळी होता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

दि.२८/०५/२०२३
रात्री ०८.३१ वा.



रंग गुलाबी धवल केशरी
हिरवा पिवळा पसरे
क्षणात सारे दुःख कोंडले
मन हे माझे विसरे

केवळ पाहून स्पर्श जाणवे
कोमलतम रेशमी
कुठून आणीशी विविधता तू
कसे न पडते कमी

जन्म आवडता जर का देशील
सुमन सुमनी मज कर रे
खुलून येईन फुलून जाईन
आस एवढी भर रे
देवा, एवढाच मज वर दे

दि.०१/०६/२०२३
सकाळी ०७.४७ वा.

## (६९)
## एवढाच मज वर दे

कोणकोणत्या रंगफुलांचा
हट्ट मी देवा करावा
तू जे सारे देतो निर्मून
कृतज्ञ भाव धरावा

इथे लगडले झाड फुलांनी
वाटे मी स्वप्नात
धुके पसरले सभोवताली
लावण्यही कणाकणात



## (७०)
## बहावा

गुलमोहरा शेजारी, फुललेला हा बहावा
आपुल्याच सोनेरीशा, धुंदीत हा पहावा

लेऊन स्वर्णलोलक, कुणी हासऱ्या पऱ्या त्या
कांचन झग्यातल्या की, कुणी राजकुमाऱ्या त्या

का नववधू सलज्ज, हळदावलेली गोरी
की शालू पैठणी ही, जणू झुंबरांची कोरी

हिरव्या ऋतुतली ही, पिवळी फुले सुरेख
फुलता बहावा येतो, पाऊस मागे देख

डोळ्यास हा दिलासा, उन्हे थंड गार गार
बसतो मनात नेहमी, छेडी सुखाची तार

दि.०४/०६/२०२३
सकाळी ०५.२७ वा.



## (७१)
## तुझे बहाणे...

रंग बावरे फुलून आले
गुलाब काही खुलून आले
कळ्या उमलल्या वारे झुलले
ऋतू कुणी वेगळेच झाले

झाली कसली आज ही किमया
मनात सजली नवीच दुनिया
नवीच स्वप्ने नव्याच आशा
नेत्र उतावीळ चित्र देखण्या

ऐकू येती मज सूर नव्याने
नव्या प्रीतीच्या कूजनवेळा
हरवून जाते हरखून जाते
सभोवताली पाहून मेळा

वेली तरुंवर सुसज्ज सुमने
फुलाफुलांवर मधुकर गुंजन
झुळूक हवेची सुखकारक ही
सृष्टीमधले सुंदर रंजन

इथेच रमतो जीव सुखाने
निवांत क्षणही निवांत पहाणे
हृदयांतरी रस नवनव सारे
नवे खुमारे पुन्हा वहाणे
गोड मोहवीती तुझे बहाणे..

दि.०७/०६/२०२३
सकाळी ०८.१२ वा.



## (७२)
## मोगरी सुवास

उमलून मोगरा हसतो
सखी ह्रदयी जाऊनी बसतो
प्रीतीच्या दालनी याला
बहुमान किती असतो

रुसवा कधी तियेचा
असता कधी अबोला
काहीच ना करावे
दे मोगरा तियेला

माळून देशी गजरा
ती सहजी विरघळेल
तो मोगरी सुगंध
दोघात दरवळेल

किती दाह देई ग्रीष्म
त्यातच फुलून येतो
कोमलसा मोगरा हा
पीडा हरून नेतो

जर वाटते असावी
दोघांची भेट खास
तेथे असावा सुंदर
हा मोगरी सुवास

दि.०८/०६/२०२३
सकाळी ०८.३२ वा.



## (७३)
## बहर मोगरी

जरा खुडू दे बहर मोगरी
शेवटचा शेवटचा
दाह जाळता घोर उन्हाळी
गंध पसरला यांचा

सुसह्य यांच्यामुळे विरहही
मीलन विशेष झाले
ओढ लागुनी निशिदिन प्रियतम
आपसुक जवळी आले

ओंजळीत कधी हुंगत यांना
शृंगार साजला होता
कधी वेणीतून माळून देता
मदन भाळला होता

शर हा मोगरा कामदेवाचा
खरेच आहे हो ना
कळी असो वा फुलती फुले ही
भाव फुलवतील जो ना

जाळणारा ग्रीष्म गेला
पाऊस जाळतो आता
सख्या घेउनी येशील का रे
पुन्हा मोगरी हाता

दि.३०/०६/२०२३
सकाळी ०७.४४ वा.



## (७४)
## बकुळ नसतो कधी फितुर

ओंजळीतल्या बकुळफुलांनो
सांगा कसे मी रहावे
प्रियाविना नुसतेच सुगंधी
कोश मी कैसे वहावे

एक एक क्षण होता तुम्ही
सोबत दोघामध्ये
तुम्हीच केली दूतगिरी कीं
लाडिक वादामध्ये

सांज सकाळी वाट पाहता
तुम्हीच साथी होता
मीलन राती घट्ट मिटूनी
नयन झाकले रहाता

तुमच्या गंधामध्ये मिसळुनी
सुरभित श्वासा केले
कळ्या कोवळ्या फुलेही नाजूक
परिमळ दाटून आले

किती आठवणी माझ्या तुमच्या
सोबतीने घडलेल्या
गेला रसिकही तुम्हा सोडुनी
वाटा ओस पडलेल्या

दुःख विरही ते तुम्हीही विरही
मी विरहातील आतुर
नका सोडू ना साथ तुम्ही तरी
बकुळ नसतो कधी फितुर

दि.१४/०७/२०२३
सकाळी ०९ .३२ वा



## (७५)
## सारे कासार शोभते

फुललेल्या कासारात
हसणारी ही कमळे
कळ्या डोलून वाऱ्याशी
गुज कानाशी चालले

चंद्र चांदणे शिंपडे
रंग दुधाळी पसरे
नभ अलगद वेडे
तळ्यामध्ये का घसरे

पानोपानी चित्रकारे
रेखवून द्यावी कला
तरंगत हिरव्याशा
पटली हवा चंचला

सांज देखणी लाजते
निशा सुंदरी गाजते
कुठूनसे सूर नवे
गीत नवेच वाजते

रात जागते जागते
सारे कासार शोभते
किती सुंदरशी शांती
इथे लाभते लाभते

दि.१८/०७/२०२३
सकाळी ०८.१३ वा.



**(७६)**

## आतल्या बागेत सुंदर फूल

मनातून उमललेल्या हास्याच्या पाकळ्या
फुले होऊन जातात पटकन आनंदाच्या कळ्या

रंग कोणते म्हणून काय विचारता तुम्ही?
सारे रंग आनंदाला आपलेच की नाही?

काळजाची एक एक परत अलगद उलगडू लागते
आतल्या खऱ्याखुऱ्या भावनांची परागकणी खुलून येते

मग काय सुगंधाच्या भांडारांचे सांगावे
आत गंध बाहेर दरवळ दिव्यत्वाला हुंगावे

रोज फुलून येते एक आतल्या बागेत सुंदर फूल
हसून त्याचे स्वागत करता आत्म्यालाही पडते भूल

दि.२२/०७/२०२३
सकाळी ०८.४८ वा.



## (७७)
## जुई मन होत जाते

जुई नाजूक तनाची
जुई हळव्या मनाची
तलमशा भावनेची
जुई सुरभी सुरेख

तिच्या मृदू गावी जावे
वेलीवर हिंदोळावे
पानोपानी गीत गावे
राग मारवा तू ऐक

वारा अलगद वाहे
तिला हळुवार पाहे
स्पर्श गंधाळून राहे
सुकुमार क्षण एक

तिची कलिका कोवळी
भाव बावळी बावळी
गुंग संग उतावळी
दिव्य तेजोमय रेघ

रेशमाचे अंग अंग
मन जुईतून दंग
बाण मदनी अनंग
मदनाची रती देख

जुई मन होत जाते
जुई अलवार गाते
जुईमय जग होते
ऋतू फुलता अनेक

दि.०८/०८/२०२३
सकाळी ०५.१७ वा.



## (७८)
## ऋतुराज रंगताना

या हासऱ्या फुलांचे
हासू टिपून घ्यावे
वेलीवरी मनाला
अलवार उमलू द्यावे

आतून रंग यावे
अंगावरी रुजावे
कोशी पराग असता
वाऱ्यावरी निजावे

स्वच्छंद मंद गंध
पसरून दरवळावे
मोदात आपुल्या नादी
हुरळ हुरळ हुरळावे

फुलपाखरास थोडी
जागा दळी मिळावी
फुलराणी फुलली आहे
वनी वारता कळावी

मन माझे पुष्प व्हावे
ऋतुराज रंगताना
हरपून भान जावे
सृष्टीत दंगताना

दि.१४/०८/२०२३
दुपारी ०४.३३ वा.



## (७९)
## फुला रे,
## तुझीच कायम मनास भूल...

किती प्रसन्न किती टवटवीत
हसरे हसरे फूल
मन हे माझे गहाण पडते
कायम त्याला भूल
फुला रे, तुझीच कायम मनास भूल....

फुल्ल उमलल्या तुझ्या पाकळ्या
रंग हळदी सोन्याचा
स्पर्श कोवळा किती मुलायम
नाद जीव घेण्याचा
काळजातले वेडे खूळ
फुला रे, तुझीच कायम मनास भूल....

आत पराग हे गोड जांभळे
कण कण तरारलेले
किती खुलविती अंतरंग तव
अलगद भरारलेले
परागकोशी मधाळ गूळ
फुला रे, तुझीच कायम मनास भूल....

रानी वनी वा घरी काननी
तुझे उमलणे बहराचे
कशास बंधन तुज सौंदर्या
दिनरातीच्या प्रहराचे
अंगोपांगी परिमळ झूल
फुला रे, तुझीच कायम मनास भूल....

कधी वाटते क्षणात व्हावे
तुझ्यासारखे हळवे जगावे
काळ कळावा कळी फुलाचा
सुगंध पसरत जावे सुकावे
सुंदर जगता श्वास वसूल
फुला रे, तुझीच कायम मनास भूल....

दि.०२/०९/२०२३
सकाळी ०७.३९ वा.



## (८०)
## पुन्हा मी ओंजळीत...

करंडीत वेचलेला पारिजातक
हळूच कानी पुटपुटला
अंगणात ओघळलो सहजीच मी
पण नशिबात रोज एकच मार्ग कुठला

किती जणांचे हात लागूंनी
त्यांच्या ताब्यात जायचं मला
कुणी हळुवार कुणी अलवार
पण कुणी राकट धाकट वाटायचं मला

कशासाठी उचलतील पडलेल्या मला
खरंच माहीत नसतं ना
देवघरात प्रेयसी कुंतलात की
परडीतच सुकायचं असतं ना

खाली माझा मीच कोसळतो
तेंव्हा कुठे लागलं का मला
हेही विचारत नाही कुणी
की नाही कुणी दिलासत मला

कधी तर नसतंच यायचं मला
झाडावरून खाली ओघळत
म्हणून तगवून बसतो देठाशी
तेवढ्यात कुणीतरी काढतं ओरबडत

इतका हळवा मी
हळूच आसवं ढाळू लागतो
सुगंधाच्या कोशात असा
स्वतःच कसा अडकू लागतो

कुणीतरी पुन्हा येतं,
आसवांना दव म्हणतं
पुन्हा मी ओंजळीत
अधीकच तडपू लागतो...
अधीकच तडपू लागतो...

दि.११/०९/२०२३
रात्री ११ .३८ वा.



## (८१)
## गुलाबपुष्पापरी वहावे

फुलले फुलले गुलाब दोन
मनी उमलले सांग ग कोण
नेम कोणते कुणी मारे
मदनबाण की भाले कोन

कळी कळी खुलवुनी गेली
स्पर्श मुलायम मल्मली
रंग ठसवुनी जातो हा
गुलाब गुल की दंग गुलाली

कुणी अधरांवर पिळले फूल
तव गालांवर टाकीत भूल
वरच्या गंधित दवबिंदूंच्या
खळ्या पाडिल्या गहन विपूल

कधी वाटते तेजाली तू
कधी मधाळी मधुली तू
कधी गोडसर गोड गुलाबी
मधुराणी मनमानी तू

पुन्हा पुन्हा पाहुनी पहावे
पुन्हा पुन्हा राहुनी रहावे
तुझ्याच ह्दयी मनास माझ्या
गुलाबपुष्पापरी वहावे

दि.१२/०९/२०२३
रात्री ०९.४९ वा.



## (८२)
## आस मधुरल्या क्षणांची

अशा उमलल्र्या बागेमधले
क्षण ते तुझे नि माझे
आजही प्रिया आठवते ना
सांज सुरावट गाजे

किंचित हलकी लाटांची ती
कुजबुज तळ्यात चाले
घरट्याम्ध्ये माय पक्षिणी
दाणे पिलांस घाले

तिथून आला गुंजारव बघ
कभिन्न मिलिंद नाचे
फुलभोवती कसल्या ओळी
प्रीतलेख जणू वाचे

सावल्या जरा ढळल्या आता
संध्या अवतरलेली
तुझी नि माझी जवळीक वेड्या
तशात मंतरलेली

सैर कितीदा झाली व्हावी
उपवन उद्यानांची
तुला सांगते आजही मला
आस मधुरल्या क्षणांची
आस मधुरल्या क्षणांची

दि.१४/०९/२०२३
सायं ०५.५५



## (८३)
## फूल ते किती वाट पाहते

फुलांचे राज्य अळुमाळू
ते इतुके असते कनवाळू
मुलायम पाकळ्या जैशा
मनाला तैसे सांभाळू

जो वेगे वाहतो वारा
किती हळुवार होई ना
नको उमळाया फुलराण्या
मधुर गुंजनात गाई ना

तो पाऊस हलके हलकेच
असा अलवार कोसळतो
न पडण्याचे दुःख त्याला
फुलांवर दवरूपे मिसळतो

उन्हाची लाही लाही थांबे
फुलांशी शांत होण्या झोंबे
दुपारी ताप संपे सगळा
उन्हाचे होई जणू चांदणे

शेवटी येणाऱ्याजाणाऱ्या
वाटसरुसाठी हसते
कुणी येईल रसिक हळवा
फूल ते किती वाट पाहते

दि.२७/१०/२०२३
सकाळी ०६.१३ वा.



## (८४)
## रंगवल्ली सुंदर परिभाषा

कुठे फुलांचे उमलून आले
सारे सारे ताटवे
उगाच कोणी मृदुमनाचे
हळवेसे आठवे

नुसती उमलून आली तर ठीक
हलके हलके हसती
फुले कोवळी नाजूक तलम ही
मनात जाऊन बसती

काय करावे काही सुचेना
आज रांगोळी सजली
फुले नक्षीच्या रंगांमध्ये
अलगद जाऊन भिजली

जशी मांडणी केली गेली
खुशीत बसली कुसुमें
रंग वेगळे गडद निराळे
उठून हुरळले फिके

सुगंध गेले मिसळून सारे
एकमेकांतून
सोडून आपुले माझे माझे
एक झाले आतून

आता कळेना मोहक कोण की
रंग गंध आकार
रंगवल्ली सुंदर परिभाषा
ईश कृपया साकार
होई ईश कृपया साकार

दि.२८/१०/२०२३
सकाळी ११.०७ वा.



## (८५)
## खुणवत राही वाट सोनेरी

पीतफुलांच्या सड्यात होती
सोनसोनळी तुझी आठवण
गाव नदीच्या काठावरती
ओंजळीत स्मृती शिंपल साठवण

त्या प्रासादी एक कांचनी
तरू तरुण जो पहारा देई
त्या कुसुमांच्या मखमालीशा
पायघड्यांची सय मज येई

मऊ मऊशा स्पर्शामधले
ते भूतकालीन रंग देखणे
ते हलकेसे फुलाफुलांच्या
स्वप्नांना तू मी नित रेखणे

अंगावरती पडतानाही
किती कोवळ्या झरती भावना
एक अनामिक ओढ ती तिथली
ओढत नेते आजही मना

खुणवत राही वाट सोनेरी
सांजेची ती पिवळी पश्चिम
उगवत होती सोनसकाळही
सोनपिवळीशी सकळसुलश्चिम

दि.१७/११/२०२३
रात्री १०.५८ वा.



## (८६)
## धरतीशी भुले अंबर

खुलल्या कळ्या अचानक
वारा कुठून आला
रानात गंधवेली
उमलून सोहळा झाला

कळी कळी खुलून आली
डोलून फांदी गेली
परिमळ कीर्ती दाही
दिशांस पवने नेली

ते रंग रंगणारे
ते संग संगणारे
मृदुता अनुभवावी
की अंग दंगणारे

कोठून जुळते सारे
मातीस गंध का रे
रेशीम आणते कोठून
देते फुलास ना रे

कोठून येती रंग
मिटली कळी पसंद
फुलत्या फुलास कोणी
मनी करते जेरबंद

ठेऊन हाती अलगद
पाहणे फुलास सुंदर
की राहो ते तिथेच
धरतीशी भुले अंबर

दि.१८/११/२०२३
रात्री ०७.२८ वा.




## (८७)
## प्रेमाची शिदोरी वेगळी गं

अबोली बकुळीने धरलाय फेर
प्राजक्ता राणीच्या बघ चौफेर
सांग सांग कोण आहे मनी सखे तो
गाली तुझ्या हसू देऊन लपलाय जो

सोडा सोडा वाट माझी जाऊ द्या मला
असं कुणी कोंडतं का नाजूकशा फुला
कुणी नाही कुणी नाही माझ्या गो मना
अलवार फुलले मी सहजी पुन्हा

आज कशी वेगळीच वागलीस तू
फुलताना गालामध्ये लाजलीस तू
शुभ्र तुझ्या पाकळ्याही थरथरल्या
लाज गाली येऊनिया का बिथरल्या

नाही गं सख्यांनो, बकुळफुलांनो
अबोलीच्या राण्यांनो, समजून घ्या
वारा थोडा गारगार, झोम्बला ग फारफार
म्हणून ही थरथर उमजून घ्या

कुणीतरी आहे तुझ्या मनात बसलं
आतून कुणीतरी लाडिक हसलं
लपवू नको, आम्ही सख्या तुझ्या
सांगणार नाही कुणा गोड गुपिता

कसं सांगू आला तो गं भुलला म्हणे
गंध माझा घेऊनिया डुलला म्हणे
सोन्या माझा सोनचाफा जपेन मला
कोशी त्याच्या अलगद ठेवेन मला

खरं सांगू मीही रंगरूपावर भाळले
मोहूनिया गंधावर मागे मागे चालले
आता बाई अर्पियले माझे मीच त्याला
सोनचाफा प्राजक्ताचा नुकताच झाला

कित्ती छान गोडी गं, अनुरूप जोडी गं
प्रीतीची भेट मोठी आगळी गं
एकमेका गंध द्या जीवनी सुगंध घ्या
प्रेमाची शिदोरी वेगळी गं
प्राजक्ता गालात लाजली गं

दि. २१/१२/
दुपारी १२:३६



## (८८)
## तुजवर आजही भुलला ग

तीन कळ्या ह्या मोगरीच्या
सहज हाती मी धरल्या ग
तुला पाहता अवचित फुलल्या
मनी भावना खुलल्या ग

तू मी शेजारीच होतो ना
अंगणी माझ्या फुलती फुलं
तू रोज रोजची गुंतून यातून
पाहण्या यायची सारी फुलं

काही कळ्या मग मोगरीच्या
नाजूक हाती खुडायचीस
पुन्हा पुन्हा तू याच फुलांच्या
प्रेमामध्ये पडायचीस

आजंही हाती येई मोगरा
तरळून जातो तुझा चेहरा
प्रफुल्ल ऐशी तूही सदैव
कधी भेटशील अशी जरा

पुन्हा मनीच्या माझ्या अंगणी
प्रीतमोगरा फुलला ग
तुलाच देण्या बहारपुष्पे
तुजवर आजही भुलला ग

दि. २९/०५/२१
सकाळी ०७.४६ वा.



## (८९)
## दोषी सखये मोगरा

दोषी सखये मोगरा
मज दोष तू देऊ नको
पाहतो मी त्यास आणिक
न कळे का मी बहकतो

कुठून येती ही फुले
मज नेती तुझिया आठवा
मन क्षणी आभाळ होते
तो क्षणांचा बघ थवा

पाकळी अन पाकळी
गंधात बुडूनी हासते
मी काय करू मज सांग तू
त्या फुलात तू मज भासते

कवळे मल्मली स्पर्श अंग
गंध श्वासातून ये
तीच सुरभी मोगऱ्याची
धुंद मज वेडावते

रोमरोमी अणुरेणू तुन
मोगरा मी होतसे
त्या तुझ्या बघ अंगोपांगी
अन विसावण्या लोभ ते

कल्पनेतील मीलनाच्या
चालल्या कथा मोगरी
आजही तू भासते मज
तीच लोभस नवरी

गंध होते मोगऱ्याचे
की तुझी ती मोहिनी
आजही मी तृप्त त्याने
मोगऱ्याच्या या मनी

दि.०८/०५/२१
सकाळी ०८.४३ वा.



(९०)

## काट्याकुट्यातून डोले फूल

काट्याकुट्यातून डोले फूल
मनास पडते क्षणात भूल
परिस्थितीला देऊन हूल
आनंदाने असेच झूल

असे असते मज जर का जीवनी
मीही गेलो असतो प्रगतीतुन
असे नाही ना मनासारखे
परिस्थितीला दूषण आतून

कशास कुढणे नकोच रडणे
काट्यांचे अंथरूण करणे
आज असेल जर हिम्मत कळीची
काट्यातूनही सुंदर फुलणे

रंग केवढा चटकदार बघ
पराग हसरे आकर्षक
किती मुलायम शरीर पाकळ्या
रुपडे अति चित्ताकर्षक

असेच फुलवू जीवन आपुले
काट्यांच्याही रुक्ष वनी
बीजामध्ये असेल इच्छा
उमलून जाऊ आधी मनी

वरवरती मग प्रकटित करणे
वास्तव रूप हे गोजिरवाणे
ती काट्यांची पार्श्वभूमी आणि
त्यावर रेशीम फुलवून देणे

नक्की थबकतील रसिक तुझ्याशी
काट्यातूनही फुलल्या फुलाशी
कौतुक शतपट अधिकच होईल
रसिकही निष्ठा तुजवर ठेवील

कुणी पाहो व नच पाहू दे
कौतुक होवो अथवा न होऊ दे
आपल्यासाठी आपण फुलणे
इतके आतून पक्के होऊ दे

दि.१२/०५/२१
सकाळी १०.२३ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु, सुरभी (फुले) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) – श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) – सृष्टीगंध, (तिच्यावरील प्रीत कविता) – नादश्रुती, श्वेता, (सकाळ–संध्याकाळ) – लाघव वेळा, (वेळा) – तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – सहा सोहळे, (पशु) – खाणाखुणा, (पक्षी) – वैष्णवी, (स्त्रीजीवन) – स्वामिनी, मृणालिनी, (धरती–आकाश) – प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) – मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) –प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता, (ललितलेख) – मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२१
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utmsource=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ६०
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ४३
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●